POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१६१ ● मुंबई, सोमवार, १२ जानेवारी २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## लोकल खोळंब्यानेच मुंबईकरांच्या आठवड्याची सुरुवात

## १२-१३ जानेवारीला २४० गाड्या रद्द




**■मुंबई। प्रतिनिधी,**

शनिवार-रविवार मेगा ब्लॉकमध्ये घालवल्यानंतर मुंबईकरांच्या आठवड्याची सुरुवात ही पुन्हा एकदा लोकलच्या खोळंब्यानेच होणार आहे. पश्चिम रेल्वेच्या सहाव्या मार्गिकेचे काम डिसेंबरपासून सुरू असून, तेव्हापासूनच या मार्गावर दररोज अनेक लोकल गाड्या रद्द केल्या जात आहेत किंवा विलंबाने धावत आहेत. आता येत्या सोमवार आणि मंगळवारी, १२ व १३ जानेवारी रोजी पश्चिम रेल्वेच्या तब्बल २४० लोकल रद्द करण्यात येणार आहेत. त्यामुळे प्रवाशांनी घराबाहेर पडण्यापूर्वी वेळापत्रक पाहूनच प्रवास करावा, असं आवाहन पश्चिम रेल्वेनं केलं आहे.

**कारण काय?**

पश्चिम रेल्वेनं सहाव्या रेल्वे मार्गाच्या बांधकामाच्या अनुषंगाने कांदिवली-बोरिवली विभागात मोठ्या ब्लॉकची घोषणा केली होती. सध्या सुरू असलेला हा ३० दिवसांचा ब्लॉक २०/२१ डिसेंबर २०२५ च्या रात्री सुरू झाला असून, तो १८ जानेवारी २०२६ पर्यंत कायम राहणार आहे. याच ब्लॉकअंतर्गत येत्या आठवड्यातही सोमवार आणि मंगळवारी मोठ्या प्रमाणात लोकल सेवा रद्द केल्या जाणार असल्याची माहिती शुक्रवारी रेल्वे प्रशासनाने दिली.

**मध्य रेल्वेवर आज मेगा ब्लॉक**

मध्य रेल्वेच्या मुख्य मार्गावर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई ते विद्याविहार दरम्यान अप आणि डाऊन धीम्या मार्गावर सकाळी १०.५५ ते दुपारी ३.५५ या वेळेत ब्लॉक राहील. या कालावधीत सकाळी १०.४८ ते दुपारी ३.४५ दरम्यान सीएसएमटीहून सुटणाऱ्या डाऊन धीम्या लोकल गाड्या सीएसएमटी ते विद्याविहार दरम्यान डाऊन जलद मार्गावर वळवण्यात येतील. या लोकल गाड्या बायकुला, परळ, दादर, माटुंगा, शीव आणि कुर्ला स्थानकांवर थांबतील आणि त्यानंतर विद्याविहार येथे पुन्हा डाऊन धीम्या मार्गावर वळवण्यात येतील.

**वेळापत्रक पाहा**

पश्चिम रेल्वेचे मुख्य जनसंपर्क अधिकारी विनीत अभिषेक यांनी दिलेल्या माहितीनुसार, ११ आणि १२ जानेवारी २०२६ रोजी मध्यरात्री कांदिवली येथील कारशेड मार्गावरील पॉइंट क्रमांक १०४ चे विघटन केले जाणार आहे. यावेळी अप जलद मार्गावर रात्री ११.१५ ते पहाटे ३.१५ तर डाऊन जलद मार्गावर पहाटे १.०० ते ४.३० या वेळेत ब्लॉक असणार आहे. त्यानंतर १२ आणि १३ जानेवारी २०२६ रोजी कांदिवली येथे क्रॉसओव्हर १०१, १०२, १०३ आणि १०४ चे कनेक्शन जोडण्याचे काम केले जाणार असून, या काळातही अप जलद मार्गावर रात्री ११.१५ ते पहाटे ३.१५ आणि डाऊन जलद मार्गावर पहाटे १.०० ते ४.३० दरम्यान ब्लॉक राहील. या रात्रकालीन ब्लॉकसह पाचव्या मार्गिकेवरील बंदीमुळे १२ जानेवारी रोजी अप मार्गावरील ६० आणि डाऊन मार्गावरील ६० अशा एकूण १२० लोकल गाड्या रद्द करण्यात येणार आहेत. तसेच १३ जानेवारी रोजीसुद्धा अप आणि डाऊन मार्गावरील प्रत्येकी ६० अशा एकूण १२० लोकल सेवा रद्द केल्या जाणार आहेत. त्यामुळे सोमवार आणि मंगळवारी मिळून एकूण २४० लोकल रद्द होणार असून, मुंबईकर प्रवाशांचा मोठा खोळंबा होण्याची शक्यता आहे.

## जानेवारीत नाही मिळणार 'लाडकी बहीण'चा हफ्ता

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना' ही महिलांसाठी एक महत्त्वाची योजना आहे. महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणे या योजनेचा मुख्य उद्देश आहे. या अंतर्गत प्रत्येक महिन्याला पात्र महिलांना १५०० रुपये थेट बँक खात्यात जमा होतात. ही रक्कम त्यांना छोट्या गरजांसाठी किंवा घरगुती खचार्साठी उपयोगी पडते. योजना २१ ते ६५ वर्षांच्या महिलांसाठी आहे, ज्यात विवाहित, विधवा, घटस्फोटित किंवा कुटुंबातील एक अविवाहित मुलगी यांचा समावेश होतो. आतापर्यंत लाखो महिलांना या योजनेचा लाभ मिळाला आहे, पण काही तांत्रिक अडचणींमुळे त्यात व्यत्यय येतोय. अनेक महिलांना जानेवारीत लाडकी बहीणचा हफ्ता मिळणार नाही. काय आहे यामागचं कारण? सविस्तर जाणून घेऊया.

**आवश्यक कागदपत्रे**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी महिलांना काही अटी पूर्ण कराव्या लागतात. कुटुंबाची वार्षिक उत्पन्न २.५ लाख रुपयांपेक्षा कमी असावे. बँक खाते आधारशी जोडलेले असावे, कुटुंबात चारचाकी वाहन नसावे, कोणीही करदाता किंवा सरकारी कर्मचारी नसावा. आवश्यक कागदपत्रांमध्ये आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र आणि उत्पन्न प्रमाणपत्र यांचा समावेश आहे. पिवळ्या-नारंगी रेशन कार्डधारकांना उत्पन्न प्रमाणपत्राची गरज नाही. हे निकष पूर्ण केल्यास महिलांना मासिक रक्कम मिळू शकते.

**योजनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न**

या योजनेच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर भर देत आहे, पण हप्त्यातील विलंबामुळे योजनेच्या विश्वासार्हतेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. सरकार लवकरच हप्त्याची तारीख जाहीर करेल आणि त्यांची आर्थिक अडचण दूर करेल, असे म्हटले जात आहे. तरी विभागाकडून स्पष्ट सूचना नसल्यामुळे गोंधळ वाढलाय.




**डिसेंबर हप्त्याला उशीर**

नव्या वर्षाच्या सुरुवातीला लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये मोठी गोंधळाची स्थिती निर्माण झाली आहे. डिसेंबर २०२५ ची रक्कम अद्याप अनेकांच्या खात्यात आलेली नाही. त्यामुळे जानेवारी २०२६ च्या हप्त्याबाबतही शंका निर्माण झालीय. महिलांना हप्ता कधी मिळेल? याची स्पष्ट माहिती नाही, ज्यामुळे त्यांचे आर्थिक गणित बिघडलय. काही महिलांनी केवळ आपल्या ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली तरीही हप्ता मिळाला नाही. या विलंबामुळे महिलांमध्ये अस्वस्थता वाढली आहे आणि त्यांना रोजच्या खचार्साठी अडचणी येत आहेत. सरकारकडून या संदर्भात अद्याप कोणतीही ठोस माहिती देण्यात आलेली नाही.

**जानेवारीच्या हफ्त्याचं काय?**

जानेवारी २०२६च्या हप्त्याची अधिकृत तारीख अद्याप जाहीर झालेली नाही. काही बातम्यांनुसार, १५ जानेवारी २०२६ रोजी इटउ निवडणुका झाल्यानंतर हप्ता जारी होऊ शकतो. तसेच डिसेंबर आणि जानेवारीचे दोन हप्ते एकूण ३००० रुपये १४ जानेवारीला मकर संक्रांतिच्या आसपास एकत्र दिले जाऊ शकतात, अशी चर्चा आहे. पण मुख्यमंत्री कार्यालय किंवा विभागाकडून या वृत्ताला दुजोरा देण्यात आलेला नाही. यापूर्वी नोव्हेंबरचा हप्ता जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात आला होता. या अनिश्चिततेमुळे महिलांना प्रतीक्षा करावी लागतेय.

**लाडकी बहीण योजना निवडणूक आयोगाच्या कचाट्यात अडकणार?**

महायुती सरकारची महत्वाकांक्षी योजना असलेली ह्यमुख्यमंत्री लाडकी बहीणह्न ही योजना जाहीर झाल्यापासूनच प्रचंड चर्चेत असते. कधी कधी ती वादाच्या भोवऱ्यातही सापडली आहे. मात्र या योजनेअंतर्गत पात्र ठरणाऱ्या महिलांना दरमहा १५०० रुपये दिले जातात. गेल्या दीड वर्षांपेक्षा अधिक काळ राज्यातील अडीच कोटी महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. मात्र असं असलं तरी लाडक्या बहिणींना डिसेंबरचा आणि जानेवारीचा हप्ता, ते पैसे अद्याप मिळालेले नाहीत. गेल्या महिन्यात नोव्हेंबरचे पैसे पात्र महिलांच्या खात्यात जमा झाले. मात्र डिसेंबर संपून जानेवारी उजाडला आणि जानेवारीचे १० दिवस उलटून गेले तरी त्या दोन महिन्यांचा हप्ता किंवा ते पैसे काही अद्याप जमा झालेले नाहीत. येत्या १४ किंवा १५ जानेवारी रोजी दोन्ही महिन्यांचे मिळून असे ३००० हजार रुपये महिलांच्या बँक अकाऊंटमध्ये जमा होण्याची शक्यता आहे. पण मतदानाच्या आदल्या दिवशीच डिसेंबर २०२५ आणि जानेवारी २०२६चे पैसे जमा झाल्यास ही गोष्टी १ कोटींहून अधिक महिलांना प्रभावित करू शकते. यावरून आक्षेप नोंदवत काँग्रेसने राज्य निवडणूक आयोगाला पत्र लिहीलं असून महानगर पालिकेची निवडणूक झाल्यानंतर लाडकी बहिण योजनेचे पैसे वितरीत करण्यात यावेत अशी मागणी केली आहे. यावर राज्य निवडणूक आयोगाकडे उत्तर दिले आहे. काँग्रेसच्या तक्रारीवर विचार करु असे आयोगाने उत्तर दिले आहे.

**स्वप्नात यायच्या तीन बायका, रात्री जंगलात जाऊन...**

## मृत्यूच्या भयानक खेळाने खळबळ





**■मुंबई। प्रतिनिधी,**

तंत्र-मंत्र आणि जादूटोण्याचं जग भारच भयानक आहे. इथे एखादं सावज सापडलं की तांत्रिक-मात्रिक त्याला पुरतं लुटून खातात. विशेष म्हणजे आजारी असलेल्या व्यक्तीवर मोठ्या भूताने कब्जा केलेला आहे. चेटकीण किंवा अन्य जीवघेण्या आत्म्याचा शरीरात वावर असल्याचे भसवले जाते. यातच संबंधित व्यक्ती गुरफटून जाते आणि शेवटी त्या व्यक्तीचा दुर्दैवी अंत होतो. अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. स्वप्नात नेहमी तीन महिला येऊन त्रास देत असल्याने एका अवघ्या 25 वर्षीय तरुणाने स्वतःचा जीव घेतला आहे. स्वप्नातल्या बायकांना घाबरून त्याने हे टोकाचे पाऊल उचलले आहे. या घटनेमुळे सर्वत्र खळबळ उडाली आहे.

**नेमकं काय घडलं?**

मिळालेल्या माहितीनुसार मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव रामदास असे आहे. गेल्या बऱ्याच दिवसांपासून तो मानसिकदृष्ट्या आजारी होता. त्याच्या स्वप्नात सतत तीन महिला यायच्या. या महिला त्याला त्याला स्वप्नात घाबरवायच्या. तसेच भयानक स्वप्नांमध्ये महिला त्याला त्रासही द्यायच्या. सतत महिलांची स्वप्ने येत असल्याने तो फारच त्रासून गेला होता. आमच्या मुलावर कोणीतरी जादू केली आहे, कोणीतरी करणी केली आहे, असे या तरुणाच्या कुटुंबीयांना वाटायचे.

**मांत्रिक जादुटोना करायचा**

याच शंकेपोटी रामदासच्या कुटुंबीयांनी त्याला मध्यपदशातील खंडवा जिल्ह्यातील अंबापाट या गावातील एका मांत्रिकाकडे नेले होते. तेथे मांत्रिक स्वप्नातील बायकांना पळवून लावण्यासाठी त्याच्यावर जादूटोना करत होता. अंबापाट या गावात रामदासची बहीण राहायची. याच बहिणीच्या ओळखीने रामदासचे कुटुंबीय त्याला मांत्रिकाकडे घेऊन गेले होते.

**पुन्हा भीतादायक स्वप्ने पडायला लागली**

रामदासच्या भावाने पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार मांत्रिकाकडे गेल्यानंतर रामदास तीन महिने व्यवस्थित होता. परंतु आता पुन्हा एकदा त्याला तीन महिलांची स्वप्ने पडायला लागायची. त्याला भीतीदायक स्वप्ने पडायची. हा त्रास पुन्हा जाणवत असल्याने रामदास फाच त्रासलेला होता. यातूनच त्याने शेवटी गुरुवारी रात्री गावातील जंगलात जाऊन विष प्राशन केले आणि स्वतःचाच जीव घेतला. दरम्यान, पोलिसांनी रामदासच्या मृतदेहाचे शवविच्छेदन केले आहे. रामदासने तणावामुळे स्वतःला संपवले की त्याच्या मृत्यूमागे काही घातपात आहे, याचा पोलीस शोध घेत आहेत. परंतु अंधश्रद्धेला बळी पडल्याने रामदासचा अंत झाल्याने हळहळ व्यक्त केली जात आहे.

**काळीज पिळवटणारा व्हिडीओ, पत्नीच्या डिलिव्हरीसाठी आलेल्या जवानाचा मृत्यू**

## एकीकडे नवजात बाळाचा जन्म, दुसरीकडे जवान पतीचे अंत्यदर्शन



**ओली बाळंतीण तान्ह्या बाळासह स्ट्रेचरवर आली...**

व्हायरल व्हिडीओमध्ये दिसतं की, अंत्यदर्शनावेळी प्रमोद जाधव यांची पत्नी स्ट्रेचरवर आहे. शरीर वेदनेत आहे, मन मात्र अधिकच कोलमडलं आहे. तिचा आक्रोश ऐकून सर्वच स्तब्ध झाले. नातेवाईकांच्या हातात तिची नवजात लेक आहे. तिला अजून कळतही नाही, आपण नेमकं काय गमावलं आहे... पण त्या आईच्या डोळ्यांतून वाहणाऱ्या अश्रूंमध्ये सगळं काही स्पष्ट दिसत आहे. पत्नी आणि नवजात लेकीचा हा प्रसंग दाखवणारा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून तो पाहताना अनेकांना अश्रू अनावर होत आहेत. प्रमोद जाधव यांच्यावर शासकीय इतमामात मानवंदना देत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रशासनातील अधिकारी, माजी सैनिक, नातेवाईक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशसेवेसाठी सदैव तत्पर असलेल्या या वीर जवानाच्या अकाली जाण्याने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

**■मुंबई। प्रतिनिधी,**

संपूर्ण महाराष्ट्राच्या मनाला अक्षरशः चटका टाकणारी घटना सातारा जिल्ह्यातून समोर आली आहे. पत्नीच्या डिलीव्हरीसाठी सुट्टीवर घरी आलेल्या भारतीय सैन्य दलाच्या जवानाचा अपघाती मृत्यू झाला आणि काही तासांतच त्यांच्या पत्नीने कन्यारत्नाला जन्म दिला. पतीच्या मृत्यूनंतर अवघ्या आठ तासांत जन्मलेल्या चिमुकल्या लेकीने आणि गर्भवती अवस्थेतून बाहेर आलेल्या पत्नीने स्ट्रेचरवरून पती-पित्याचे अंतिम दर्शन घेतल्याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला असून, तो पाहून कोणाच्याही डोळ्यांत पाणी येईल.





भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले जवान प्रमोद जाधव यांचा सातारा जिल्ह्यातील दरे येथे झालेल्या अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. प्रमोद हे आपल्या पत्नीच्या डिलिव्हरीसाठी काही दिवसांची रजा घेऊन गावी आले होते. कुटुंबात आनंदाचे दिवस येणार, लेकराचा जन्म होणार या अपेक्षेत असतानाच काळाने घाला घातला. अपघातात प्रमोद यांचा मृत्यू झाल्याने संपूर्ण कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला.

अधिकची माहिती अशी की, वीर जवानाचा अपघातात मृत्यू झाल्यानंतर काही तासांतच प्रमोद यांच्या पत्नीने मुलीला जन्म दिला. एकीकडे बाळाच्या आगमनाचा आनंद, तर दुसरीकडे पतीच्या मृत्यूचे दुःख या दोन टोकाच्या भावना एकाच वेळी सहन करणे कुणालाही अशक्य वाटावे असे होते. मात्र नियतीचा खेळ इथेच थांबला नाही. प्रमोद जाधव यांच्यावर त्यांच्या मूळ गावी दरे तर्फ परळी येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यदर्शनासाठी रुग्णालयातून थेट स्ट्रेचरवरून गर्भवती पत्नी आणि अवघ्या आठ तासांची चिमुकली लेक आणण्यात आली. पित्याच्या पार्थिवावर फुलं अर्पण करताना आईच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू आणि त्या निरागस बाळाची शांत झोप हा प्रसंग अंगावर काटा आणणारा होता. "आईसह ८ तासांच्या लेकीने स्ट्रेचरवरून घेतले अंत्यदर्शन घेतानाचं दृश्य पाहून उपस्थित प्रत्येकाचं काळीज पिळवटून गेलं."

या प्रसंगाचा व्हिडीओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून, संपूर्ण महाराष्ट्र हळहळ व्यक्त करत आहे. "देशासाठी सेवा करणाऱ्या जवानाच्या कुटुंबावर अशी वेळ येऊ नये," अशी भावना नागरिक व्यक्त करत आहेत. गावकऱ्यांनी, स्थानिक प्रशासनाने आणि सैन्य दलातील अधिकाऱ्यांनी जाधव कुटुंबाच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला. वीर जवान प्रमोद जाधव यांनी देशसेवेसाठी आयुष्य वेचले. त्यांच्या जाण्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असला, तरी त्यांच्या कन्येच्या रूपाने त्यांची आठवण कायम जिवंत राहणार आहे. हा प्रसंग केवळ एक बातमी नसून, देशासाठी बलिदान देणाऱ्या जवानांच्या कुटुंबांच्या वेदनांची जिवंत साक्ष आहे.

## लग्नाच्या नावाखाली सौदा अन् नंतर छळ

**■वाडा। प्रतिनिधी,**

पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यातून पुन्हा एकदा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. गारगाव गावातील कातकरी समाजातील एका तरुणीचे आर्थिक व्यवहार करून अन्य जातीतील तरुणाशी जबरदस्तीने लग्न लावून देण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. लग्नानंतर होणाऱ्या सततच्या शिवीगाळ, मानसिक आणि शारीरिक छळाला कंटाळून अखेर पीडित तरुणीने वाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गारगाव गावातील कातकरी समाजातील या तरुणीचे २०२४ मध्ये नाशिक जिल्ह्यातील वडगाव येथे राहणाऱ्या अन्य जातीतील तरुणाशी लग्न लावण्यात आले. या लग्नासाठी आर्थिक व्यवहार झाल्याचा आरोप असून, नाशिक हे दूरचे ठिकाण असल्याने तरुणीची आई सुरुवातीला लग्नासाठी तयार नव्हती. मात्र गावातील एका महिलेने आधी फूस लावली आणि नंतर धमकावल्याने आईला नाईलाजाने संमती द्यावी लागली. एका मध्यस्थामार्फत हा विवाह लावण्यात आल्याचे तपासात पुढे आले आहे. या विवाहामागे आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे. लग्नानंतर काही दिवसांनीच तरुणीला घरगुती कामे येत नाहीत, जेवण नीट बनवत नाही, अशा कारणांवरून तिचा छळ सुरू झाला. शिवीगाळ, मानसिक तणाव आणि शारीरिक त्रास यामुळे तिचे जगणे अवघड झाले होते. मध्यस्थाच्या नावाने तीन लाख रुपये दिल्याचा उल्लेख करत, ती रक्कम परत दे आणि घरातून निघून जा, अशी धमकी दिल्याचेही तरुणीने तक्रारीत नमूद केले आहे.

**चिमुकल्याला विष पाजलं अन् विवाहितेने आयुष्य संपवलं**

## काळजाचं पाणी करणारी घटना... २ वर्षात असं काय घडलं?

**■मुंबई। प्रतिनिधी,**

एका महिलेने आपल्या ११ महिन्यांच्या बाळाला विष देऊन नंतर गळफास लावून आयुष्याची अखेर केली आहे. कौटुंबिक वादातून तिने हे टोकाचं पाऊल उचलल्याची माहिती आहे. तेलंगणाची राजधानी हैदराबाद येथे ही घटना घडल्याची माहिती आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळ गाठलं आणि मृतदेह ताब्यात घेत शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. सध्या पोलिस याप्रकरणाचा तपास करत असल्याची माहिती आहे. मृताच्या कुटुंबाने हत्येचा आरोप केला आहे, तर महिलेच्या पतीने हे सारे आरोप फेटाळले आहेत.

हैदराबादच्या मीरपेट पोलिस स्टेशन परिसरातील हस्तिनापुरम भागात यशवंत रेड्डी यांची पत्नी सुष्मिता (२७) ने तिच्या ११ महिन्यांचा मुलगा नंदा याला विष देत त्याची हत्या केली. त्यानंतर तिने स्वतः गळफास



घेत आपल्या आयुष्याची अखेर केली आहे. त्यांना गंभीर अवस्थेत पाहून कुटुंबाने ताबडतोब जवळच्या रुग्णालयात नेले, जिथे तपासणीनंतर डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

सुष्मिता यांच्या कुटुंबीयांनी सांगितलं की, सुष्मिता यांनी दोन वर्षे चार महिन्यांपूर्वी यशवंतशी लग्न केले होते. तेव्हापासून यशवंत याने सुष्मितासोबत तिच्या घरच्यांचं बोलणं बंद केलं. त्याने सुष्मिताचं माहेरच्यांपासून तिला खूप दूर केलं होतं. आम्ही आमच्या मुलीशी फोनवरही बोलू शकत नव्हतो. तो नेहमीच सुष्मिताला शिवीगाळ करत होता. त्यांच्यात कौटुंबिक वाद होता. सुष्मिताने आपले आयुष्य संपवले, असे आम्हाला वाटत नाही. घटनेचे सीसीटीव्ही फुटेज लपवले जात आहे.

तर, याप्रकरणी महिलेचा पती यशवंतने म्हटले आहे की, त्याच्या पत्नीने आपल्या आयुष्याची अखेर केली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी मृतदेह ताब्यात घेतले आणि शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. पोलिसांनी प्रकरणाची नोंद करत तपास सुरू केला आहे. या घटनेने परिसरात एकच शोककळा पसरली आहे. तर, लेकीचा मृत्यू झाल्याने कुटुंबात शोकाचं वातावरण आहे. प्राथमिक दृष्ट्या पोलिस हे प्रकरण कौटुंबिक वादातून महिलेने जीव दिल्याचं असल्याचं मानलं जात आहेत. सध्या पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत.

## रागाच्या भरात बापाने पोटच्या जुळ्या मुलांचा विहिरीत ढकलून जीव घेतला, पश्चाताप झाल्याने स्वतःही विष प्यायला

**■सोलापूर। प्रतिनिधी,**

बापाने पोटच्या सात वर्षांच्या जुळ्या चिमुकल्या मुलांना विहिरीत ढकलून देऊन दोघांचा जीव घेतल्याचा दुर्दैवी प्रकार घडला. ही घटना सोलापूर जिल्ह्यातील करमाळ्यात शनिवारी (दि.१०,जानेवारी) सकाळी घडली. किरकोळ वादातून दोन निष्पाप चिमुकल्यांनी जीव गमावल्याने केत्तूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

**पोटच्या मुलांचा विहिरीत ढकलून जीव घेतला**

अधिकची माहिती अशी की, करमाळा तालुक्यातील केत्तूर येथील रहिवासी व वीज कंपनीत म्हणून कर्मचारी असलेले सुहास ज्ञानदेव जाधव (वय ३२) याने घरात किरकोळ घडलेल्या घटनेतून भयंकर कृत्य केलंय. किरकोळ वाद झाल्यानंतर रागाच्या भरात पोटच्या शिवांश सुहास जाधव व श्रेया सुहास जाधव या दोन चिमुकल्या मुलांना हिंगणी (ता. करमाळा) येथील शेतात नेले व तेथेच त्यांना विहिरीत ढकलून दिले. त्यानंतर सुहास यांनीच काही वेळाने स्वतः घरी फोन करून हा प्रकार सांगितला. त्यानंतर घरातील सर्वजण विहिरीकडे धावत आले. मात्र, तोपर्यंत दोनही चिमुकल्यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला होता.

**बापाने पश्चात्ताप झाल्याने विषारी औषध प्राशन केले**

या घटनेची माहिती समजताच पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पाण्यात बुडून मृत्यू झालेली जुळी बहीण-भाऊ आहेत. या प्रकरणी करमाळा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सुहासने आपल्या जुळ्या मुलांना कोणत्या कारणामुळे मारले? याप्रकरणी पोलिस तपास करीत असल्याची माहिती पोलीस निरीक्षक रणजित माने यांनी दिली. संशयित सुहास जाधव याने मुलांना विहीरीत ढकलून देत हत्या केल्यानंतर पश्चात्ताप झाल्याने विषारी औषध प्राशन केले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेतल्यानंतर उपचारासाठी त्याला सोलापूरच्या सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे.






संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# मुंबईचा 'वाली कोण'?




**राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुका सुरू असल्या तरी सर्वच राजकीय पक्षांचे लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या सत्तेवर केंद्रित झाले आहे. 'मुंबईचे वाली आम्हीच' असा दावा करणाऱ्या राजकीय रणधुमाळीत मात्र मुंबईकरांचे खरे प्रश्न आणि अपेक्षा दुय्यम ठरत असल्याचे चित्र दिसत आहे.**

विधानसभा निवडणुकीतील विजय, नगरपरिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीतली विजयी घोडदौड महायुतीने कायम ठेवली आणि आताही महानगरपालिकेच्या निवडणुकीत काही ठिकाणी नगरसेवकांचा बिनविरोध विजय यामुळे भाजप व शिंदे सेनेच्या नेत्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात असून त्यासाठी फक्त ४ दिवस शिल्लक आहेत. भाजप व शिंदे सेनेच्या नेत्यांनी राज्यात प्रचारासाठी स्वतःला झोकून दिले. मात्र आता भाजप, शिंदे सेना, मनसे, ठाकरे सेनेने मुंबईकडे मोर्चा वळवला आहे. मुंबईतील शिवाजी पार्क मैदानावर ११ जानेवारीला ठाकरे बंधूंची फटकेबाजी, तर १२ जानेवारीला भाजप व शिंदे सेनेची जाहीर सभा होणार आहे. दोन्ही पक्षांच्या या सभांकडे राज्यातील जनतेचे लक्ष लागले आहे. ठाकरे बंधू कोणाचे वाभाडे काढणार, तर देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे कोणावर तोफगोळा डागणार याची उत्सुकता लागली आहे. मात्र मुंबईला व मुंबईकरांना अपेक्षित काय मिळणार याची शाश्वती कुठलाच नेता देणार नाही, हेही तितकेच खरे. राजकारण अन् भ्रष्टाचार हे समीकरण तसं नवीन नाही. वाहत्या पाण्यात हात धुवून घ्या, अशी ओळख काही भ्रष्ट अधिकारी व राजकारण्यांची. राजकारणी म्हणजे दुसऱ्या देशातून आलेली व्यक्ती नव्हे, तर तुम्ही-आम्ही निवडून दिलेला हक्काचा लोकप्रतिनिधी. अगदी ग्रामपंचायत ते दिल्लीतील खासदार तुमच्या-आमच्या मतांवर निवडून आलेले लोकप्रतिनिधी असतात. मतदार राजाच्या समस्यांचे निवारण करणे ही माफक अपेक्षा लोकप्रतिनिधींकडून असते. निवडणुका जवळ आल्या की, हा लोकप्रतिनिधी आपल्या हक्काचा या विश्वासावर तुम्ही-आम्ही मतदान करतो. मात्र एकदा का आपला विश्वासू उमेदवार निवडून आला की, समाजकारण दूर होऊन तो राजकारणात गुंतला जातो. मतदार राजाने निवडून दिले म्हणून इथपर्यंत पोहोचलो याचा विसर लोकप्रतिनिधींना पडत असावा किंवा जाणूनबुजून दुर्लक्ष करत असावेत. मात्र ज्यांच्या मतांवर राजकीय प्रवासाची सुरुवात होते त्याच मतदार राजाचा विसर लोकप्रतिनिधींना पडतो, हे मतदार राजाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल. २० टक्के राजकारण अन् ८० टक्के समाजकारण हे वाक्य आता बदलत आहे. सध्याचे राजकारण हे जनतेसाठी कमी आणि स्वतःसाठी अधिक असे सुरू आहे. एखाद्या पक्षाने तिकीट नाकारले, पक्षात समाधानकारक पद मिळाले नाही तर थेट दुसऱ्या पक्षात उडी मारायची आणि मनासारखं करून घ्यायचं, असा राजकारणाचा पॅटर्न बदलत चाललाय. मतदार राजाने दिलेल्या मतालाही शून्य किंमत दिली जाते. महायुती असो वा महाविकास आघाडी, मनसे असो वा ठाकरे सेना किंवा अन्य पक्षाचे राजकारण हे अर्थपूर्ण राजकारणाच्या दिशेने सुरू असून जनतेच्या प्रश्नांना केराची टोपली दाखवली जाते. मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याच्या नावाखाली राजकारण सुरू आहे. राजकारणात सर्वसामान्य जनतेच्या नशिबी खड्डेमय रस्ते, पिण्याच्या पाण्यासाठी वणवण, आरोग्य सेवा व्हेंटिलेटरवर या सगळ्याला कारणीभूत सध्या सुरू असलेले राजकारण. 'खुर्चीसाठी काय पण' असा राजकीय कारभार सुरू असून 'मुंबईला काय मिळाले' याचा विचार मतदार राजानेही करणे गरजेचे आहे. आपल्या मतदारसंघातील समस्यांचे निवारण, पायाभूत सुविधा मिळणे याच मतदार राजाच्या माफक अपेक्षा. मात्र गेल्या काही वर्षांत राजकारणी मंडळींचे राजकारण त्यांच्याच अवतीभवती सुरू आहे. सत्तेत असो वा नसो एकमेकांची उणीदुणी काढणे यात राजकीय नेतेमंडळी धन्यता मानतात. निवडणुका जवळ आल्या की, मतदार राजाचे आम्हीच वाली असा टेंभा नेतेमंडळी मिरवतात. मात्र निवडणुकीचे निकाल जाहीर झाले की, सगळे गंगेला मिळाले. ज्या मतदार राजाच्या मतांवर निवडून येतो, त्या मतदाराचे आपण काही देणं लागतो याचा विसर बहुतांश नेतेमंडळींना पडत असावा. सत्ता, खुर्ची यापलीकडे राजकारणच नाही, असे चित्र गेल्या काही वर्षांत पहावयास मिळत आहे. मतदार राजाच्या मतांवर निवडून यायचं आणि नंतर मतदार राजाचाच विसर ही राजकारण्यांची उत्तम खेळी म्हणावी लागेल. आता महाराष्ट्रातील राजकारणात २० वर्षांनी ठाकरे बंधू एकत्र आले आणि राजकारण ढवळून निघत आहे. भाजप, शिंदे सेना, ठाकरे बंधू, काँग्रेस व वंचित निवडणुकीच्या रिंगणात एकत्र उतरले आहेत. मुंबईवर ताबा मिळवणे, कोट्यवधी रुपयांच्या ठेवी असलेल्या मुंबई महानगरपालिकेतील सत्ता काबीज करणे हा सर्वच राजकीय पक्षांचा अजेंडा आहे. दिवसेंदिवस वाढती महागाई, बेरोजगारी यामुळे सर्वसामान्य जनतेचे कंबरडे मोडले आहे. राज्यात दिवसागणिक बेरोजगारीचा आलेख वाढतच आहे. गेल्या एक-दीड वर्षांत लाखो तरुण इच्छुकांनी रोजगार पोर्टलवर नोकरी मिळावी यासाठी नोंदणी केली. बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी ठोस धोरण असणे गरजेचे आहे. मात्र राज्यात सत्तेत कुठलेही सरकार असो, रोजगार निर्मितीच्या धोरण निश्चितीकडे सगळ्यांचाच कानाडोळा असतो. निवडणुका जवळ आल्या की, घोषणांचा पाऊस पाडायचा. रोजगार निर्मितीसाठी केंद्र सरकार असो वा राज्य सरकार धोरणात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे. तर आणि तरच बेरोजगारीवर मात करणे शक्य होईल. मात्र राजकारणी राजकारण करण्यात धन्यता मानतात. राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. १५ जानेवारी रोजी राजकीय पक्षांचे राजकीय भवितव्य मतपेटीत बंद होणार असून १६ जानेवारीला मतपेटीचा पेटारा उघडणार आहे. त्यामुळे १३ जानेवारीपर्यंत प्रचाराचा धडाका, आश्वासनांचा पाऊस कोसळणार, परंतु प्रत्यक्षात मुंबईकरांच्या पदरी काय पडणार, याचे उत्तर पुढील पाच वर्षांत मिळेल याची शाश्वती नाही.

# ही वस्तुस्थिती लपत नाही!




महाराष्ट्रातल्याच एका कुटुंबाने महाराष्ट्राच्या आदिवासी जमातीतील एक मुलगी विकत घेण्याचा हा प्रकार गंभीर तर आहेच; पण अन्य भागातला हा गैरप्रकार महाराष्ट्रातही फोफावला असल्याचा पुरावा आहे. महाराष्ट्र हे सामाजिक - सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानलं जात असलं, तरी इथेही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार घडतच नाहीत, असं कोणी म्हणू शकणार नाही.

भारतातली स्त्री मुक्ती चळवळ आपलं सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत असतानाच मुंबईपासून अवघ्या ८० किलोमीटर अंतरावर तीन लाख रुपयांना मुलींची विक्री झाल्याचं प्रकरण काल उघड झालं. भारतात काही भागांत महिलांची खरेदी-विक्री सर्रास होते, ही चर्चा यापूर्वी अनेकदा झाली आहे. पत्रकारांनी सप्रमाण त्याचे पुरावे दिले आहेत. त्यावर आधारित नाटक-सिनेमे गाजले आहेत. अनेक शोधनिबंध प्रसिद्ध झाले आहेत. अनेक संस्थांनी सर्वेक्षणं करून या खरेदी - विक्रीमागच्या सामाजिक कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला आहे. महिलांची खरेदी-विक्री हा मानवी तस्करीचाच भाग मानून त्याबाबत देशात कडक कायदे आहेत. पण, तरीही अशी खरेदी-विक्री देशाच्या उत्तर भागात व्यवहाराचा नित्याचा भाग मानली जाते. गेल्या काही वर्षांत यात पुन्हा वाढ झाली असून हरियाणा, पंजाब आणि राजस्थान ही तीन राज्य त्यासाठी विशेष बदनाम आहेत. कृषी क्रांतीच्या अग्रणी असलेल्या या तीनही राज्यांत जमीन आणि स्थावर मालमत्तेला मोठी किंमत आणि प्रतिष्ठा असल्याने आजही तिथे मुलगाच जन्माला यावा, अशी धरणा सर्व सधन कुटुंबांत असते. स्त्री भ्रूणहत्येविरोधात कितीही कायदे झाले, प्रबोधनात्मक चळवळी झाल्या तरीही पुरुषसत्ताक समाजाची मनोवस्था अद्याप पूर्णपणे बदललेली नाही. काही अंशी बदल झाला असेलही. पण, त्याने स्त्रीभ्रूणहत्येने निर्माण होणारे प्रश्न संपलेले नाहीत. उत्तरेकडच्या काही राज्यातील ही स्थिती कागदावर आहेच; पण त्याचबरोबर समाजात त्यामुळे निर्माण झालेल्या कुप्रथांची चर्चाही सर्वत्र आहे. 'पारो', 'खरीदी हुयी', 'मोल की बहु' या घरांतील विशेषणांनी समाजात त्यांचा एक वेगळा दर्जाही तयार झाला आहे. सामाजिक स्तरावर अशा 'सुनां'साठी ही विशेषणं व्यापकपणे स्वीकारलीही गेली आहेत. अमेरिकेत छुपेपणाने पोहोचण्यासाठी जसा 'डन्की' मार्ग होता, तसाच या खरेदी केलेल्या महिलांना त्यांच्या खरेदीदार घरापर्यंत पोहोचवण्यासाठी वहिवाटीचे मार्गही तयार झाले आहेत. नेपाळबरोबरच देशातील बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, आंध्र, हिमाचल, झारखंड आणि ओडिशातल्या दुर्गम, ग्रामीण, गरीब कुटुंबातील मुलींची खरेदी करून त्यांना दिल्ली, पालवाल, कर्नाल, काल्का, अंबालातील ठरावीक ठिकाणी आणून नंतर खरेदीदारांच्या भागात पाठवलं जातं, असं यापूर्वी प्रसिद्ध झालं आहे.

उत्तरेतलं हे लोण महाराष्ट्रातही आलं आहे. विशेषतः आदिवासी पट्ट्यात दलालांनी आपलं जाळं विणलं असल्याचं कालच वाडा तालुक्यात दाखल झालेल्या एका पोलीस तक्रारीतून उघड झालं आहे. मूळ तक्रार कौटुंबिक हिंसाचाराची असली, तरी त्या तक्रारीच्या तपशिलात संबंधित महिलेला सिन्नर तालुक्यातील एका कुटुंबाने तीन लाख रुपयांना काही वर्षांपूर्वी खरेदी केलं असल्याचं नमूद करण्यात आलं आहे. खरेदी केलेल्या या कुटुंबाने तिला सून म्हणूनच घरी ठेवलं असलं, तरी 'खरेदी' असल्याने तिच्यावर कामाचा असह्य बोजा होता. तेही ती नीट करत नाही, म्हणून तिला एकदा माहेरीही सोडून देण्यात आलं होतं. पण, नंतर तिला मुलगा झाल्यानंतर पुन्हा माहेरी पाठवून मुलासह खरेदीचे पैसे परत करण्याची मागणी सुरू झाल्याने प्रकरण चिघळलं आणि पोलिसात गेलं. त्यातून हा प्रकार उघड झाला. महाराष्ट्रातल्याच एका कुटुंबाने महाराष्ट्राच्या आदिवासी जमातीतील एक मुलगी विकत घेण्याचा हा प्रकार गंभीर तर आहेच; पण अन्य भागातला हा गैरप्रकार महाराष्ट्रातही फोफावला असल्याचा पुरावाच आहे. महाराष्ट्र हे सामाजिक - सांस्कृतिकदृष्ट्या प्रगत राज्य मानलं जात असलं, तरी इथेही स्त्रीभ्रूणहत्येचे प्रकार घडतच नाहीत, असं कोणी म्हणू शकणार नाही. त्याचं प्रमाण इतर राज्यांपेक्षा कमी असू शकेल. पण, 'वंशाला दिवा हवा' ही भावना इथेही प्रबळ आहेच. आर्थिक ओढगस्तीने एकाच अपत्याचा विचार समाजात रुजला असल्याने 'एकच अपत्य हवं, तर तो मुलगाच हवा' हा आग्रहही बळावला आहे. परिणामी महाराष्ट्रातील लिंग गुणोत्तर प्रमाण पुन्हा ढासळलं असून त्याची निश्चित आकडेवारीही उपलब्ध आहे. मुलांच्या विवाहाची समस्या जटिल झाली आहे. येत्या काही दिवसांत तीच महाराष्ट्रातील सर्वात मोठी सामाजिक समस्या म्हणून सोडावी लागणार आहे!

ठाणे जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील गारगावला काल जी घटना उघड झाली, त्यालाही हीच पार्श्वभूमी आहे. या सामाजिक समस्येतूनच महिलांच्या खरेदी - विक्रीला चालना मिळते आहे. विवाह समारंभांचे वाढलेले खर्च, हुंडा, मानपान, विवाहोत्तर राहणीमानाच्या कल्पना यामुळे मुलींच्या गरीब बापांची स्थिती बिकट झाली आहे. अशा परिस्थितीत हा 'उलट हुंडा' ही दोन्ही बाजूंसाठी सोयीचीच बाब ठरते. मुलींच्या गरीब पित्यांना नाईलाजाने स्वीकारावी लागत असलेली ही 'व्यवस्था' सामाजिक कार्यकर्त्यांसाठी मोठं आव्हान आहे. 'लाडकी बहीण'सारख्या योजनेचा अशा समस्यांवर काय उपयोग झाला किंवा होऊ शकतो, याचा सविस्तर अभ्यास व्हायला हवा. समाजातल्या तळागाळातल्या मुली-तरुणी-महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होणं हेच यावरचं एकमेव उत्तर आहे. नियोजनकर्त्यांनी त्यादृष्टीने महिला कल्याणाच्या योजनांचा विचार केला पाहिजे. योजनांची अंमलबजावणी, गरजूंपर्यंत त्या पोहोचवणं हा आणखी वेगळा मुद्दा आहे. त्यासाठी सामाजिक संस्थांची मदत प्रभावी ठरू शकते. ठाणे जिल्ह्यात उघड झालेली ही घटना महाराष्ट्राला लांच्छन आहे, असं समजून तिची तेवढ्याच गांभीर्याने दखल घेण्याची गरज आहे. कोणत्याही घटनेमागील कारणांचा विचार केल्याशिवाय त्या घटनेचं विश्लेषण होऊ शकत नाही. गारगावला झालेल्या महिलेच्या खरेदी-विक्री व्यवहाराला या किंवा अशाच आणखी काही बाजू असू शकतील. त्या समजून घ्याव्याच लागतील. पण, त्याने महाराष्ट्रात महिलेची सहजपणे खरेदी-विक्री झाली, ही वस्तुस्थिती लपत नाही!



# देशातील पहिला वन्यजीव सुरक्षित महामार्ग

**मध्य प्रदेशमधील घनदाट नौरादेही येथील वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्पातून जाणारा भोपाळ-जबलपूर हा राष्ट्रीय महामार्ग ४५ देशांतील पहिला वन्यजीव-सुरक्षित महामार्ग ठरला आहे. या महामार्गाच्या बांधकामात रस्त्यावर पाच मिलिमीटर जाडीचे 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग' लावण्यात आले आहेत. केवळ चालकांचा वेग कमी करणे हा यामागील उद्देश नसून वन क्षेत्रात राहणाऱ्या वन्यजीवांची सुरक्षितता सुनिश्चित केली जात आहे.**

मध्य प्रदेशमधील नौरादेही व्याघ्र प्रकल्पातून जाणाऱ्या महामार्गाचा सुमारे ११.९६ किलोमीटरचा भाग दोन आणि चार लेनमध्ये विकसित करण्यात आला आहे. सुमारे दोन किलोमीटर लांबीच्या संवेदनशील वन्यजीव क्षेत्रात हे 'रेड टेबल-टॉप मार्किंग' बसवण्यात आले आहेत. एखादे वाहन या लाल ब्लॉकवरून जाते, तेव्हा चालकाला थोडासा धक्का बसतो. त्यामुळे तो त्याचा वेग कमी करतो. लाल रंग आधीच धोक्याचा सिग्नल मानला जातो, म्हणून हे तंत्रज्ञान चालकांच्या मानसशास्त्रावरदेखील परिणाम करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (एनएचएआय)च्या अधिकाऱ्यांच्या मते, वेगाने येणाऱ्या वाहनांमुळे या भागात हरिण, नीलगाय आणि इतर वन्यजीवांचे रस्ते अपघात पूर्वी सामान्य झाले होते. हा भाग धोकादायक क्षेत्र मानला जात होता. त्यावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आंतरराष्ट्रीय मानके लक्षात घेऊन हे नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यात आले. रस्त्याच्या दोन्ही बाजूला फक्त 'रेड टेबल-टॉप मार्किंग'च नाही तर पाच मिलिमीटर जाडीच्या पांढऱ्या पेव्हर शोल्डर लाइन्सदेखील तयार करण्यात आल्या आहेत. एखादे वाहन रस्त्यावरून घसरले किंवा चालक झोपला तर त्यांना सतर्क करण्यासाठी त्वरित कंपनांचा वापर केला जातो. शिवाय प्राणी सुरक्षितपणे रस्ता ओलांडू शकतील, यासाठी २५ वन्यजीव अंडरपास बांधण्यात आले आहेत. या तंत्रज्ञानाच्या अंमलबजावणीपासून येथे एकही अपघात किंवा वन्यजीवांना दुखापत झाल्याचे वृत्त नाही. वीरांगना राणी दुर्गावती व्याघ्र प्रकल्प हा मध्य प्रदेशमधील सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प आहे. हा परिसर भारतीय लांडगा, पँथर, जंगली कुत्रा, कोल्हा, राखाडी कोल्हा आणि ओटर यांसारख्या अनेक दुर्मीळ वन्यजीव प्रजातींसाठी एक प्रमुख अधिवास आहे. २०१८ मध्ये राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात त्याचा समावेश करण्यात आला होता आणि वाघांची संख्या आता २६ वर पोहोचली आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी एक्सवर पोस्ट केले, की विकास आणि पर्यावरण यांच्यातील संतुलन आणि वन्यजीवांचे संरक्षण लक्षात घेऊन भारतात प्रथमच महामार्गावर पाच मिलिमीटर लाल 'रेड टेबल-टॉप ब्लॉक मार्किंग'चा वापर करण्यात आला आहे. २०१८ मध्ये या जिल्ह्याचा राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्रकल्पात समावेश करण्यात आला. येथे चितळ, चिंकारा आणि नीलगाय यांचीही संख्या वाढत आहे. काळविटांनादेखील संरक्षित क्षेत्रात सोडण्यात आले आहे. त्यामुळे मांसाहारी प्राण्यांना नैसर्गिक अन्न चक्र मिळते. नौरादेही व्याघ्र प्रकल्प सागर, दमोह आणि नरसिंहपूर या तीन जिल्ह्यांमध्ये पसरला आहे. मध्य प्रदेशची राजधानी भोपाळला सांस्कृतिक राजधानी जबलपूरशी जोडणारा राष्ट्रीय महामार्ग ४५ चा एक महत्त्वाचा भाग आता देशभरात महामार्ग अभियांत्रिकी आणि वन्यजीव संवर्धनाचे एक मॉडेल बनला आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, प्रकल्प अंमलबजावणी युनिटने नरसिंहपूर आणि जबलपूरमधील सुमारे बारा किलोमीटरच्या अत्यंत संवेदनशील भागाचे संरक्षण करण्यासाठी अभूतपूर्व आणि नावीन्यपूर्ण तंत्रांचा वापर केला आहे. हा भाग वीरांगना दुर्गावती व्याघ्र प्रकल्पाच्या (पूर्वी नौरादेही वन्यजीव अभयारण्य) सीमेवरून जातो. वन्यजीवांच्या वावरामुळे आणि डोंगराळ प्रदेशामुळे हा भाग पूर्वी एक अपघात-प्रवण क्षेत्र मानला जात होता. महामार्ग चौकापासून बेलखेडापर्यंत असंख्य अपघात होत असत. त्यामुळे प्रवासी आणि वन्यजीव दोघांसाठीही सुरक्षित कॉरिडॉर सुनिश्चित करण्यासाठी १२२.२५ कोटी खर्चाच्या ११.९६ किलोमीटर प्रकल्पात विशेष उपाययोजना राबवण्यात आल्या आहेत. सुमारे १२ किलोमीटर लांबीच्या रस्त्यावर पाच मिलिमीटर जाडीचे उंच लाल मार्किंग लावण्यात आले आहे. एखादे वाहन त्यातून जाते, तेव्हा हलकासा धक्का निर्माण करते. त्यामुळे चालक आपोआप वेग कमी करतो. रस्त्यावरून जाणाऱ्या स्थानिक रहिवाशांनी सौंदर्य आणि सुरक्षिततेमुळे त्याला 'रेड कार्पेट' असे टोपणनाव दिले आहे. येथे वन्य प्राण्यांची सुरक्षित हालचाल सुनिश्चित करण्यासाठी २५ अंडरपास बांधण्यात आले आहेत. त्यामुळे त्यांना महामार्गाच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूला धोका न घेता जाता येते. येथे वन्यजीवांना रस्ता ओलांडण्यापासून रोखण्यासाठी संपूर्ण संवेदनशील भागात 'चेन-लिंक' कुंपण बसवण्यात आले आहे. रात्रीच्या अपघातांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आणखी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पाच मिलिमीटर जाडीची पांढरी खांद्याची रेषा तयार करण्यात आली आहे. चालक झोपेमुळे किंवा दुर्लक्षामुळे मार्गावरून दूर जायला लागला, तर ही रेषा लगेचच तीव्र धक्का देऊन त्याला सावध करते. या प्रकल्पाचे उद्दिष्ट प्रवासी आणि वन्यजीवांसाठी सुरक्षित प्रवास सुनिश्चित करणे हे आहे. भविष्यात हा महत्त्वाचा मार्ग पुन्हा कधीही 'ब्लॅक स्पॉट' बनू नये, याची दखल घेण्यात आली आहे. देशासाठी हा महामार्ग सुरक्षेचे एक अनुकरणीय मॉडेल आहे. जंगली क्षेत्रातून जाणारा आणि डोंगर कापून बांधलेला हा रस्ता तीव्र वळणाचा आहे. यावर उपाय म्हणून 'स्पीड डिटेक्टर' बसवण्यात आले आहेत आणि रस्त्याला लाल रंग देण्यात आला आहे. त्याला 'टेबलटॉप रेड मार्किंग' म्हणतात. या उपक्रमामुळे विकास आणि पर्यावरण संरक्षण हातात हात घालून जाऊ शकतात, हे दिसते. रस्ते बांधणीसोबतच प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणे महत्त्वाचे आहे. भोपाळ-जबलपूर महामार्गावर सुरू करण्यात आलेले हे 'रेड टेबलटॉप मार्किंग' भारतातील रस्ते सुरक्षा आणि वन्यजीव संवर्धनासाठी एक नवीन उदाहरण ठरू शकते. ते यशस्वी झाल्यास देशभरातील इतर संवेदनशील महामार्गांवरही लागू केले जाऊ शकते. हा लाल रस्ता 'स्पीड ब्रेकर'पेक्षा वेगळा आहे. तो सामान्य स्पीड ब्रेकर किंवा रंबल स्ट्रिपसारखा नाही. तो थोडा उंचावलेला आहे आणि दुरून स्पष्टपणे दिसतो. असे असले, तरी अनेक लोकांना भीती वाटते, की वेगळ्या रंगाचा रस्ता 'एडीएएस' प्रणालीला गोंधळात टाकू शकतो. हा लाल रस्ता दुबईच्या शेख झायेद रस्त्याचे अनुकरण आहे. शेख झायेद रस्त्यावर विशिष्ट भागात स्पष्ट रंगीत खुणा आहेत. त्यामुळे अपघात कमी झाले आहेत. भारतातील या प्रयोगातून रस्ते आता केवळ वाहनांसाठीच नव्हे तर मानव, प्राणी आणि पर्यावरण लक्षात घेऊन बांधले जात आहेत, असे दिसून येते. रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या मते, हा प्रकल्प पर्यावरण मित्रत्व, सार्वजनिक सुरक्षा आणि वन्यजीव संरक्षणाच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे लाल रस्ता धोक्याचा नव्हे, तर बुद्धिमान डिझाइनचे प्रतीक ठरत आहे.

# 'जे.एन.यू.'ला टाळे ठोका !



'अफजल हम शर्मिंदा है, तेरे कातिल जिंदा है', 'तुम कितने अफजल मारोगे, घर घर से अफजल निकलेगा', 'तुम कितने हिडमा मारोगे, हर घर में हिडमा पैदा होंगे', 'भारत तेरे तुकडे होंगे', अशा चिथावणीखोर घोषणा पाकिस्तानात नाही, तर भारताची राजधानी असलेल्या देहलीतील सरकारी अनुदानित जवाहरलाल नेहरू विद्यापिठात अर्थात् 'जे.एन्.यू.'मध्ये आतापर्यंत दिल्या गेल्या आहेत. यातील अफजल हा जिहादी आतंकवादी महंमद अफजल होता, तर हिडमा हा जहाल नक्षलवादी होता. आता या घोषणांमध्ये आणखी भर पडली आहे. नुकत्याच या विद्यापिठात साम्यवादी विचारसरणीच्या तरुणांनी 'मोदी-शहा की कब्र खुदेगी', अशी अत्यंत चिथावणीखोर घोषणा दिली. ही घोषणा सर्वोच्च न्यायालयाने देहली दंगलीतील आरोपी शारजिल इमाम आणि उमर खालिद या शहरी नक्षलवादी प्रवृत्तींना जामीन नाकारल्यानंतर लगेचच दिली गेली. याच विद्यापिठात वर्ष २०१६ मध्ये पाकिस्तानच्या समर्थनार्थ घोषणा देण्यात आल्या होत्या. तेव्हापासून येथे उघड उघड देशद्रोह व्यक्त केला जाऊ लागला. तेव्हापासून आजपर्यंत वरीलपैकी एकाही घटनेत दोषी विद्यार्थ्यांवर जरब बसवणारी कारवाई ना सरकारकडून झाली, ना विद्यापिठाकडून ! परिणामी त्यांचे धाडस वाढत गेले. ते इतके वाढले की, याच मानसिकतेच्या लोकांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हत्येचा कट रचला. म्हणजे यांच्या घोषणा या केवळ शाब्दिक बुडबुडे नसतात, तर त्याला घातक कृतीशीलतेची जोड असते, हे लक्षात घेतले पाहिजे. जो नेता या विद्यापिठाला भरघोस पैसा देतो, त्याचीच या लोकांना कबर खोदायची आहे. हे तेच लोक आहेत, ज्यांनी काही वर्षांपूर्वी जे.एन.यू.मध्ये योगऋषी रामदेवबाबा यांचा कार्यक्रम होऊ दिला नव्हता. येथे छत्रपती शिवाजी महाराज यांना विरोध करणारे 'आधुनिक औरंगजेब' भरले आहेत. येथे कायम ब्राह्मणविरोध उघडउघड प्रकट केला जातो. पुढे याच ब्राह्मणविरोधाच्या आडून हिंदु धर्मार्ला पद्धतशीरपणे लक्ष्य केले जाते. थोडक्यात जे.एन.यू. आता केवळ विध्वंसक साम्यवाद्यांचा गडच नव्हे, तर देशद्रोहाचा आणि हिंदुविरोधाचा सर्वांत मोठा अड्डा बनला आहे. तरीही सरकारकडून कारवाई शून्य!

वरील घोषणांपैकी बहुतांश घोषणा या रात्री दिल्या गेल्या आहेत. 'मोदी-शहा की कब्र खुदेगी'ही घोषणाही रात्री दिल्याचे व्हिडिओतून दिसून येते. मग प्रश्न असा पडतो की, कुठले विद्यापीठ रात्री चालू असते ? आणि समजा विद्यापिठाच्या वसतीगृहात म्हणा किंवा ह्यकॅम्पसह्लमध्ये (परिसरात) म्हणा या घोषणा दिल्या जात असतील, तेही रात्री, तर विद्यापीठ प्रशासनाने त्या रोखायला नकोत का ? पोलीस करतात काय ? एकूणच जे.एन.यू.च्या संदर्भात सरकार गेली ११ वर्षे 'बॅकफूट'वर आहे, ही वस्तूस्थिती नाकारून चालणार नाही.

**अन्य देशांत कठोर कारवाई!**

अशा प्रकारचे घातक विद्यार्थी आंदोलन अन्यही देशांत झाले आहे; परंतु त्या देशांनी आंदोलकांचा बीमोड करून त्यांना वठणीवर आणले. काही वर्षांपूर्वी अमेरिकेतील जगप्रसिद्ध कोलंबिया विद्यापिठात गाझा आणि पॅलेस्टाईन यांच्या समर्थनार्थ आंदोलन करणाऱ्या ८० विद्यार्थ्यांची विद्यापिठातून हकालपट्टी करण्यात आली होती, तर काही विद्यार्थ्यांची पदवी (डिग्री) रहित केली होती. जगप्रसिद्ध हार्वर्ड विद्यापिठातही पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पदवी शिक्षणावर ट्रम्प सरकारने बंदी आणली होती. एवढेच नव्हे, तर ट्रम्प सरकारने या आंदोलनात सहभागी झालेल्या ३०० विद्यार्थ्यांचा 'व्हिसा' (एखाद्या देशात प्रवेश करण्याची, एखादा देश सोडून जाण्याची किंवा एखाद्या देशातून प्रवास करण्याची अनुमती देणारे अधिकृत कागदपत्र किंवा शिक्का) रहित करून त्यांना त्यांच्या देशात हाकलून दिले होते. इराणमध्ये वर्ष २०२३ मध्ये अशाच प्रकारे विद्यार्थी आंदोलकांवर कठोर कारवाई करण्यात आली. एका निषेध आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांना इराणने अटक करून त्यांची संबंधित विद्यापिठातून हकालपट्टी केली, तर प्राध्यापकांवर कठोर कारवाई केली. तुर्कियेमध्येसुद्धा तेथील सत्तापालटासाठी झालेल्या एका विद्यार्थी आंदोलनात तेथील हुकूमशाही सरकारने ६ सहस्र विद्यार्थ्यांची हकालपट्टी केली होती, तसेच त्यांच्या शिक्षकांचे पारपत्र रहित केले होते. विद्यार्थी आंदोलनाच्या इतिहासातील ही सर्वांत मोठी कारवाई मानली जाते. यावरून लक्षात येईल की, कुठलाही देश अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाखाली विद्यार्थ्यांची राष्ट्रघातकी आंदोलने खपवून घेत नाहीत, तर ती मोडून काढतात. भारतात मात्र उलट चित्र दिसते. जे.एन्.यू.सारख्या विद्यापिठांना सरकार सढळ हस्ते अनुदान देते. वर्ष २०१५ ते वर्ष २०२२ या ७ वर्षांच्या कालावधीत केंद्र सरकारने एकट्या जे.एन.यू.ला ३ सहस्र कोटी रुपयांहून अधिक निधी दिला आहे. याखेरीच विद्यापीठ अनुदान आयोगाकडून जे.एन.यू.तील प्रत्येक विद्यार्थ्यार्ला प्रतिवर्ष ६ लाख ७१ सहस्र रुपये दिले जातात, ते वेगळेच. हाच पैसा राष्ट्रघातकी साम्यवाद्यांना हिंदु नेत्यांची कबर खोदण्यासाठी, तसेच हिंदूंना संपवण्यासाठी वापरायचा आहे.

जे.एन्.यू.मध्ये ९ सहस्र विद्यार्थी शिकतात, त्यातील केवळ मूठभर विद्यार्थी अभिव्यक्तीस्वातंत्र्याच्या नावाखाली सरकारला गेल्या ११ वर्षांपासून वेठीस धरतात आणि सरकार सर्व हतबलतेने पहात रहाते, हे चित्र भूषणावह निश्चितच नाही. ज्या उमर खालिदसाठी साम्यवादी विद्यार्थ्यांचा जीव तुटतो, तोही याच विद्यापिठातील आहे. याच उमर खालिदला न्यूयॉर्क शहराचे नवनिर्वाचित महापौर ममदानी पत्र लिहून 'प्रिय उमर...' अशा शब्दांत सहानुभूती दर्शवतात. यावरून या षड्यंत्राचे धागेदोरे कुठपर्यंत पोचले आहेत ?, हे लक्षात येते. फेब्रुवारी २०२३ मध्ये काँग्रेसचे नेते पवन खेडा यांच्या नेतृत्वाखाली मोदी सरकारच्या विरोधात झालेल्या आंदोलनातही 'मोदी तेरी कब्र खुदेगी', अशी घोषणा दिली गेली. त्यापूर्वी वर्ष २०१९ मध्ये 'अलीगड मुस्लिम विद्यापिठा'त झालेल्या आंदोलनातही 'हिंदु तेरी कब्र खुदेगी' अशी घोषणा दिली गेली. यावरून काँग्रेस, राष्ट्रघातकी साम्यवादी आणि धर्मांध मुसलमान यांची भाषा एकच आहे, हे लक्षात येते. ही 'एकसमानता' हिंदूंसाठी धोक्याची घंटा आहे.

**देशद्रोह्यांचे बारावे घाला!**

अशा विद्यापिठातून बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांचा देशासाठी खरे तर काडीमात्र उपयोग होत नाही; कारण देहलीमध्ये ज्याने बॉंबस्फोट केला होता, तो डॉक्टर होता. त्यामुळे सरकारने या विद्यापिठाला सरकारी अनुदान देणे तात्काळ बंद करावे आणि या विद्यापिठाला टाळे ठोकून अन्य विद्यार्थ्यांना दुसऱ्या विद्यापिठात प्रवेश द्यावा. सरकारने अद्यापही जे.एन.यू.ला अनुदान देणे बंद केले नाही, तर पुढे परिस्थिती याहून बिकट होईल. एकूणच हा विषय आता गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे. केंद्र सरकारचे १२ वे वर्ष चालू आहे. त्यामुळे सरकारने शहरी नक्षलवादी आणि त्यांचे समर्थक यांचे आता बारावे घालून हिंदूंची शक्ती दाखवून द्यावी, इतकीच अपेक्षा!



# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते? मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**

हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.

**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे अँटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, अँटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.



## विवाहित महिलांमध्ये रक्तप्रवाह नियंत्रित ठेवतात जोडवे, शृंगाराचे वैज्ञानिक महत्त्व

लग्नानंतर महिला सोळा शृंगार करतात. हिंदू धर्म परंपरांमागे विज्ञानही दडलेले आहे. महिलांनी शृंगार केलेल्या दागिन्यांचेसिद्ध वैज्ञानिक महत्त्व आहे. या सोळा शृंगारांमध्ये १५ वा क्रमांक हा पायाच्या बोटांमध्ये घातल्या जाणाऱ्या जोडव्यांचा येतो. सामान्यतः जोडवे हे चांदीचे असतात. जोडव्यांमध्ये पारंपरिक गुण असण्यासोबतच काही वैज्ञानिक फायदेही आहेत.

ज्योतिष व्यतिरिक्त मॉडर्न सायन्सही जोडवे घातल्यामुळे होणाऱ्या फायद्याविषयी सांगते. महिलांच्या पायातील दुसऱ्या बोटातील तंत्रिकेचा थेट संबंध गर्भाशयाशी असतो, जी हृदयापासून जाते आणि याच कारणामुळे उजव्या तसेच डाव्या पायाच्या दुसऱ्या बोटात जोडवे घालण्याचा सल्ला दिला जातो. यामुळे गर्भाशय स्वस्थ आणि ब्लडप्रेशर नॉर्मल राहते. शरीरामध्ये ऊर्जा प्रवाह वाढवण्यासाठी पायात चांदीचे जोडवे घालणे उत्तम राहते. चांदी शरीरासाठी थंड मानली जाते. चांदीचे जोडवे घालून जमिनीवर चालल्यास शरीराला सकारात्मक ऊर्जा मिळते. जोडवे धारण केल्यास मेंदू शांत राहतो आणि तणावही कमी होतो.

सायटीक नर्व्हच्या एका नसेवर जोडव्यांचा दबाव पडतो आणि यामुळे जवळपासच्या इतर नसांमधील रक्तप्रवाह वाढतो आणि यूट्रस, ब्लॅडर आणि आतड्यांपर्यंत रक्तप्रवाह व्यवस्थित होतो. गर्भाशयापर्यंत योग्यप्रकारे रक्त पोहोचते. शरीरात रक्तप्रवाह व्यवस्थित असल्यास आरोग्य चांगले राहते.



जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.

## फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

संपूर्ण चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे. जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी. सर्वात महत्त्वाची गोष्टम्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत. तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा. जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.



## आरोग्यदायी ऑलिव्ह ऑईल

पुरातन काळापासून ऑलिव्ह ऑईलला लिक्वीड गोल्ड म्हणून संबोधल जाते. तुमच्या दैनंदिन जीवनात याचा समावेश करा आणि यातील गुणांचा वापराने तुमचे सौंदर्य वाढवा. एका सव्हेर्नुसार जी लोकं रोजच्या जेवणात ऑलिव्ह ऑईलचं सेवन करतात त्यांना ब्रेस्ट कॅन्सर होण्याची शक्यता कमी असते. ओल्युअरपेन, या ऑलिव्ह ऑईलमध्ये आढळणाऱ्या नैसर्गिक घटकांमध्ये ब्रेस्ट कॅन्सरपासून रक्षण करण्याची क्षमता असते.

.डायबेटीसपासून रक्षण तुमच्या रोजच्या डाएटमध्ये ऑलिव्ह ऑईलचा समावेश केल्यास तुमची ब्लड शुगर लेव्हल नियंत्रणात राहते. ऑलिव्ह ऑईल हे फॅट्सविरोधी असल्याने भविष्यात तुमचं डायबेटीसही नियंत्रणात राहण्यास मदत होते. अल्झायमरपासून रक्षण एका अमेरिक संशोधनानुसार, एक्स्ट्रा व्हर्जिन ऑईलच्या उंदरावरील केलेल्या परीक्षणात त्याची बुद्धी वाढल्याचं आढळलं. त्यामुळे या थिअरीनुसार अल्झायमरच्या रुग्णांनी ऑलिव्ह ऑईलचं सेवन केल्यास त्यांचे या रोगापासून रक्षण होईल. हाडं बळकट करते ऑस्टीओकॅल्सीन हा ऑलिव्ह ऑईलमध्ये आढळणारा घटक हाडं बळकट करतो. त्यामुळे जी लोकं नियमितपणे ऑलिव्ह ऑईलचं सेवन करतात त्यांना ऑस्टिओपोरॉसिस होण्याचा धोका नसतो. वजन कमी करतं ऑलिव्ह ऑईल हे एक सुपर फूड आहे, जे तुमच्या शरीराला आवश्यक असं हेल्दी फॅट देतं. एका संशोधनानुसार, जर तुम्ही रोज ऑलिव्ह ऑईलचं सेवन केल्यास तुमचं वजन कमी होण्यास मदत होते आणि आरोग्यही चांगलं राहतं. डिप्रेशन होईल दूर ऑलिव्ह ऑईल तुमच्या मेंदूतील सेरोटोनिनची पातळी वाढवतं, हे रसायन तुमच्या मूडवर परिणाम करतं.

त्यामुळे ऑलिव्ह ऑईलचं नियमित सेवन केल्यास तुमचं एकूणच मानसिक आणि शारिरीक आरोग्य चांगलं राहण्यास मदत होते. कॉलेस्ट्रॉल कमी होतं ऑलिव्ह ऑईलमध्ये ७५३०८०% एवढ्या प्रमाणात मोनोसॅच्युरेटेड फॅट आढळतं जे तुमचं चांगलं कॉलेस्ट्रॉल आणि एचडीएल राहण्यास मदत करतं. त्यामुळे भविष्यातील हृदयविकाराचा धोका टळतो. बद्धकोष्ठता रोधक ऑलिव्ह ऑईलमध्ये आढळणाऱ्या मोनोसॅच्युरेटेड फॅट्स आणि व्हिटॅमीन ई, क, लोह आणि ओमेगा- ३, ६ फॅटी ॲसिड्स आणि अँटीऑक्सिडंट्समुळे तुमचं पचन चांगलं होतं. जर तुम्हाला बद्धकोष्ठता असल्यास दिवसातून दोनदा एक चमचा एक्स्ट्रा व्हर्जिन ऑलिव्ह ऑईल रिकाम्या पोटी घेतल्यास बद्धकोष्ठतेची समस्या दूर होईल. पण या तेलाचं सेवन करण्याआधी तुम्ही चार तास काहीही खाल्लेलं नसावं, याची काळजी घ्या. ऑलिव्ह ऑईलमधील मोनोसॅच्युरेटेड फॅट्समुळे यात फॅटी ॲसिड ओमेगा - ३ असतं. ओमेगा-३ मुळे तुमचं ब्लड प्रेशर कमी होतं, ज्यामुळे तुमचं हृदय हेल्दी ठेवतं. ज्याला एत्र्क्ष म्हणतात, कारण हे शरीरात तयार होत नाही. त्यामुळे अन्नामार्फतच घ्यावं लागतं.

## डोळ्यांच्याभोवती काळी वर्तुळे असण्यामागे असू शकतात ही कारणे

अनेकदा शारीरिक विश्रांती जर पुरेशी मिळत नसली, तर डोळ्यांभोवती काळी वर्तुळे दिसून येतात. मात्र केवळ शारीरिक थकवा आल्यानेच डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे येतात असे नाही, तर यासाठी इतरही अनेक कारणे असू शकतात. काहींच्या डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे 'पिग्मेंटेशन' मुळे असू शकतात. हे पिग्मेंटेशन काहींच्या बाबतीत अनुवांशिक असू शकते. दक्षिण आशियाई लोकांमध्ये अशा प्रकारचे पिग्मेंटेशन दिसून येते. पिग्मेंटेशनमुळे जर डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असतील, तर कितीही उपाय-उपचार केले तरी ही वर्तुळे हलकी होतात, पण नाहीशी होत नाहीत.

- ज्या व्यक्तींना चेहऱ्यावरील त्वचेवर सोरायसिस किंवा एक्झिमा सारखे त्वचा विकार असतील, त्यांच्याही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येऊ शकतात. या दोन्ही विकारांमध्ये त्वचा लालसर, किंवा गडद रंगाची दिसू लागते. तसेच सतत खाज सुटत असल्याने ही त्वचा आणखीनच काळसर दिसू लागते. त्यामुळे जर डोळ्यांच्या आसपासच्या त्वचेवर एक्झिमा किंवा सोरायसिस असले, तर त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे असल्याप्रमाणे भासतात.
- ज्या व्यक्तींना सतत डोळे चोळण्याची सवय असते, त्यांच्या डोळ्याच्या आसपासची त्वचा वारंवार चोळली गेल्यामुळे काळसर आणि काहीशी जाडसर दिसू लागते. वारंवार डोळे चोळल्याने डोळ्यांच्या आसपासची त्वचा रगडली जाते. त्यामुळे त्वचेच्या खाली असलेल्या रक्तपेशींना नुकसान पोहोचते आणि त्यामुळे त्वचा काळसर दिसू लागते.
- अनेकदा डोळ्यांभोवती काळी वर्तुळे एखाद्या ॲलर्जीमुळेही असू शकतात. या वर्तुळांच्या जोडीनेच डोळ्यांच्या आसपास हलकी सूजही दिसून येते. त्यामुळे याचे निदान डॉक्टरांकडून करून घेऊन योग्य औषधोपचार आणि भरपूर विश्रांतीनंतर ही काळी वर्तुळे नाहीशी होतात.
- शरीरामध्ये पाण्याची कमतरता झाल्यास, म्हणजेच डीहायड्रेशन झाल्यासही डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे दिसून येतात. एखाद्या आजारपणामुळे किंवा अतिरिक्त मद्यपानामुळे शरीरातील इलेक्ट्रोलाईट्स कमी होऊ लागतात, त्यामुळे डोळ्यांच्या भोवती काळी वर्तुळे उद्‌भवतात. अशा वेळी पाण्याचे प्रमाण वाढवल्याने कालांतराने ही समस्या दूर होऊ शकते.





## डेंग्यू, मलेरिया, चिकन गुनियावर परिणामकारक ठरतात 'हे' पदार्थ

डेंग्यू, मलेरिया, चिकन गुनिया यासारख्या आजारांची सध्या साथ पसरली आहे. हवामानात बदल होत असल्याने आरोग्याची काळजी घेणं गरजेचं आहे. कोणते पदार्थ आरोग्यासाठी फायदेशीर असतात हे जाणून घ्या.

संत्र- संत्र्यामध्ये व्हिटॅमिन सी, ॲन्टीऑक्सीडेंट, फायबरचे प्रमाण हे अधिक असते. त्यामुळे संत्र आरोग्यासाठी फायदेशीर आहे.

पपई - पपई त्वचेसाठी अत्यंत लाभदायक असते. पपईचं दररोज सेवन केल्याने चेहऱ्यावर सुरकुत्या, फाइन लाइन्स, पिंपल्स यांसारख्या समस्या दूर होतात. तसेच प्लेटलेट वाढवण्यासाठी पपई खाणं आवश्यक आहे.

खिचडी - खिचडीमध्ये फायबर आणि पोषक तत्त्व असल्याने आजारापासून लढण्याची ताकद मिळते. यामुळे पचन शक्ती चांगली राहते.

आलं - आलं खाल्ल्यास इम्युनिटी सिस्टम मजबूत होते. आल्यामध्ये ॲन्टी-इंफ्लेमेटरी आणि ॲन्टी बॅक्टीरियल गुण असतात त्यामुळे रोगप्रतिकारक क्षमता वाढण्यास मदत होते.

हर्बल टी - ग्रीन टी किंवा हर्बल टी घेणं आरोग्यासाठी हितकारक आहे.

नारळ पाणी - नारळ पाणी प्यायल्याने शरीराला ऊर्जा मिळते. रोग प्रतिकारक शक्ती वाढते तसेच आजारांना लांब ठेवण्यास मदत होते. थायरॉइड हार्मोन्सला संतुलित ठेवण्याचे काम नारळ पाणी करते.

व्हेजिटेबल ज्यूस - गाजर, काकडी आणि अन्य भाज्यांचा रस हा शरिरासाठी फायदेशीर असतो. भाज्यांमध्ये व्हिटॅमिनचे प्रमाण अधिक असल्याने त्याचं सेवन करणं महत्त्वाचं आहे.



## जास्वंद फुलाचे आरोग्यदायी फायदे

गणपतीला प्रिय असलेले, अतिशय मोहक दिसणारे जास्वंदीचे फूल अनेक रंगांमध्ये बघायला मिळते. लाल, पांढरा. पिवळा, गुलाबी, अश्या अनेक रंगांमध्ये हे फूल बघावयास मिळते. या फुलाला हिबिस्कस रोजा सिनेन्सीस असे शास्त्रीय नाव आहे. पण हे फूल केवळ दिसायला सुंदर नाही, तर आरोग्यासाठी ही विशेष गुणकारी आहे. या फुलामध्ये अनेक प्रकारची पोषक तत्वे आहेत. या फुलामध्ये क जीवनसत्व, कॅल्शियम, फायबर, लोह, वासा ही पोषक द्रव्ये मुबलक मात्रेमध्ये असून, अनेक व्याधींच्या औषधोपचारासाठी या फुलाचा उपयोग केला जातो.

**कोलेस्टेरोलची मात्रा नियंत्रित**

जास्वंदीच्या फुलांचा वापर करून बनविलेला काढा आपल्या शरीरातील कोलेस्टेरोलची मात्रा नियंत्रित ठेवण्यास लाभकारक आहे. यामध्ये असलेली पोषक द्रव्ये हृदयनलिकांमध्ये प्लाकपासून तयार होणारा अवरोध रोखतात. त्यामुळे आपल्या शरीरातील अतिरिक्त कोलेस्टेरोल कमी होण्यास मदत मिळते.

**ह्रुद्याची जलद गती संथ होण्यास मदत**

जास्वंदीची पाने उच्च रक्तदाब असणाऱ्यांसाठी गुणकारी आहेत. जास्वंदीची पाने पाण्यामध्ये घालून ते पाणी उकळून त्याचे सेवन केले असता, ह्रुद्याची जलद गती संथ होण्यास मदत होते.

**शारीरिक थकवा दूर होतो**

जास्वंदीची पाने पाण्यामध्ये घालून ते पाणी उकळून त्याचे सेवन केले असता, शारीरिक थकवा दूर होण्यास मदत होते.

**लोहाची कमी दूर होते**

रोज सकाळी एक लहान चमचा जास्वंदीचा रस दुधाबरोबर घ्यावा. या रसाच्या सेवनाने लोहाची कमी दूर होऊन शरीरामध्ये स्फूर्ती वाढते.

**किडनी स्टोन**

जास्वंदीच्या पानांचा काढा काही दिवस ओळीने घेतल्यास किडनी स्टोन विरघळण्यास सहाय्य मिळते.





## आरोग्यासाठी रोज दही भात खाणं ठरतं सर्वोत्तम, वजन नियंत्रणात राखण्यास मदत

बऱ्याच जणांना रोज दही खाण्याची सवय असते. पण तुम्हाला माहीत आहे का? रोज दही भात खाणं हे तुमच्या आरोग्यासाठी फायदेशीर आहे. बऱ्याच जणांना वाटतं रोज दही खाणं योग्य नसतं. त्याने शरीराला त्रास होतो. पण असं काहीही नाही. याचा नक्की कसा फायदा होतो ते आम्ही तुम्हाला या लेखातून सांगणार आहोत. फक्त दह्याचं सेवन करताना एक गोष्ट लक्षात ठेवणं गरजेचं असतं. ते म्हणजे दह्याचं सेवन शक्यतो रात्री करणं टाळा. यामुळे कफ होण्याची शक्यता असते. पण तुम्हाला खायचंच असेल तर तुम्ही त्यात साखर आणि मिरपूड घाला आणि खा. रोज दही भात खाण्याचे नक्की फायदे काय आहेत ते पाहूया. दही भात हा केवळ पोटासाठी नाही तर मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर आहे. यामध्ये असणाऱ्या अँटिऑक्सिडंट, प्रोबायोटिक्स आणि चांगले फॅट्स मिळतात. तसंच यामुळे वजनही नियंत्रणात राहातं आणि तुम्हाला ताण जाणवत असल्यास, अथवा अपचनाचा त्रास होत असल्यास त्यापासून सुटका मिळते.

**दही भात रोजं खाणं का महत्त्वाचं?**

दही आणि भात हे तुमच्या शरीरासाठी खूपच चांगलं मिश्रण आहे. हे खाण्याने ताण कमी होतो. तसंच तुम्हाला जर तिखट आवडत असेल. पण तिखट खाल्ल्यानंतर सतत घशात जळजळ होत असेल तर तुम्ही मुद्दाम त्यावर दही भात खायला हवा. त्यामुळे तुम्हाला अपचन होत नाही आणि तुमच्या पोटात थंडावा राहातो. दह्यामध्ये असलेल्या अल्कलाईन प्रभावामुळे तुमची रोगप्रतिकारक क्षमता वाढते. तसंच तुम्हाला ॲसिडिटीची समस्या असल्यास, तुम्ही दह्यातील पाणी अधिक घ्यावं. त्यामुळे ही समस्या कमी होते. तुमचं डोकं दुखणं कमी होतं. त्यामुळे नियमित दही भात तुम्ही खाल्ल्यास, तुमच्या शरीरावर चांगले परिणाम होऊन, तुमचं पोट थंड राहातं आणि तुम्हाला त्यामुळे कोणत्याही जळजळीचा त्रास होत नाही.

**केस आणि त्वचेच्या सौंदयार्सीठी दही आहे उपयुक्त**

तुमचं शरीर ठेवतं थंड दह्यामध्ये असणारे कॅल्शियम हे शरीरामध्ये अधिक फॅट सेल्स तयार होऊ देत नाहीत. तसंच रोज नियमित किमान ३०० ग्रॅम दही तुमच्या पोटात जाणं गरजेचं आहे. इतकंच नाही तुमच्या पोटात कोणत्याही प्रकारची गडबड असल्यास, अपचन असल्यास, नेहमीच दहीभात खायला दिला जातो. याचं सेवन केल्याने सर्व टॉक्झिन्स बाहेर पडतात म्हणूनच नियमित दही भात खाणं गरेजचं आहे. तसंच दही आणि भाताचं हे मिश्रण तुमचं शरीर थंड ठेवण्यास मदत करतं.

**वजन नियंत्रणात राखण्यास होते मदत**

दही भात नियमित खाल्ल्याने वजन नियंत्रणात राखण्यास मदत होते. तुम्ही स्नॅक्समध्ये तेलकट पदार्थ खाण्याऐवजी दही भात खाल्ल्यास, शरीरामध्ये कमी प्रमाणात कॅलरी पोहचते. पुलाव अथवा कोणत्याही फ्राईड राईसच्या तुलनेत साध्या दही भातामध्ये कमी कॅलरीज असतात. दही खाल्ल्याने पटकन पोट भरतं आणि बराच काळ पोट भरल्याची जाणीव राहाते. त्यामुळे भूक लागत नाही आणि वजन नियंत्रणात राहून कमी होण्यासही मदत होते. तुम्ही जेवणापूर्वी अथवा नंतर कधीही दही खाऊ शकता. फक्त दही भात शक्यतो रात्री खाणं टाळावं. ज्यांना कफाचा त्रास आहे त्यांनी तर अजिबात खाऊ नये. दही हे थंड असल्याने कफ तयार होतो. त्यामुळे

## घरच्या घरी कोणत्याही मशीनशिवाय केस असे करा सरळ

**पीन आणि स्कार्फ पद्धत :** केस सरळ करण्याची ही एक सोपी पद्धत आहे. यासाठी तुम्हाला बॉबी पीन्स, कंगवा आणि स्कार्फ लागेल. आता सगळ्यात आधी तुम्ही तुमचे केस विंचरुन घ्या. केसांच्या क्राऊन भागाकडील केस वर बांधून घ्या आणि उरलेल्या केसांपासून सुरु करा. पुढच्या केसांची बट विंचरुन ते केस मागच्या बाजूला डोक्याभोवती पीन लावत लावत सिक्युअर करा. जर तुमचे केस मोठे असतील असे करताना तुमच्या केसांच्या किमान दोन ते तीन फेऱ्या होणे अगदी स्वाभाविक आहे. असे करत करत तुम्हाला सगळे केस अशाचप्रकारे गुंडाळायचे आहेत. ते नीट राहण्यासाठी तुम्ही तुमच्या केसांना स्कार्फ बांधला तर फारच उत्तम. रात्री झोपण्याआधी हा प्रयोग करा. सकाळी उठल्यानंतर या पीना काढून टाका. तुम्हाला तुमचे केस सरळ दिसतील.

**शॅम्पू आणि कंडिशनर :** जर तुमचे केस वेवी असतील तर तुम्हाला नुसत्या शॅम्पूचा उपयोग करुनही तुम्हाला तुमचे केस सरळ आणि सिल्की करता येतील. हल्ली स्ट्रेट केसांसाठी खास शँम्पू मिळतात. याचा उपयोगही तुम्हाला होईल. शँम्पू करा. कंडिशनर लावताना तुम्ही तुमच्या टीप्स आणि बॉटमला लावा. साधारण ५ मिनिटे तरी तुम्ही कंडिशनर ठेवा. त्यानंतर केस धुवून घ्या. केस धुतल्यानंतर ते वर बांधू नका. टर्कीश टॉवेलने तुमचे केस पुसून घ्या. केस सरळ खालच्या दिशेने पुसा. वाळल्यानंतर केस ब्रशने विंचरा.(पण तुम्ही केस धुवू नका कारण केमिकल्सचा अति प्रयोग करणेही तुमच्या आरोग्यासाठी चांगले नाही.)

**स्ट्रेट पोनी :** केस सरळ करण्याची आणखी एक सोपी पद्धत म्हणजे स्ट्रेट पोनी. पण केस बांधताना तुम्हाला विशिष्ट पद्धतीने बांधायचे असतात. केस सरळ विंचरुन केसांचा भांग पाडून घ्या. केसांचे बारीक बारीक सेक्शन करुन केसांच्या लांबीनुसार तुम्ही केस बांधा. म्हणजे केसांच्या सगळ्यात वरच्या दिशेला आणि त्यानंतर हळूहळू काही अंतरावर तुम्ही रबराच्या मदतीने केस बांधा. अशा प्रकारे तुम्ही केसांच्या सगळ्या बटा बांधून घ्या. रात्री केस डोक्याच्या खाली येऊ देऊ नका. सकाळी उठून केसांमधून एक एक रबर काढून टाका. केस व्यवस्थित विंचरुन घ्या.



# ॲक्वा लाईन ठरतेय मुंबईकरांची पसंती

## वरळी-कफ परेड मार्गामुळे मेट्रो ३च्या प्रवासी संख्येत मोठी वाढ

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईच्या पहिल्या पूर्णतः भुयारी असलेल्या मेट्रो ३ला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. वरळी ते कफ परेड हा अंतिम टप्पा सुरू झाल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांत मेट्रो ३ च्या प्रवासीसंख्येत दुपटीहून अधिक वाढ झाली आहे. कोलाबाझ्बांद्राझ्सीप्झ असा ३३.५ किलोमीटरचा संपूर्ण मार्ग सुरू झाल्यामुळे दक्षिण व उत्तर मुंबईतील प्रवास अधिक वेगवान आणि सुलभ झाला आहे. इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, अंतिम टप्पा सुरू होण्यापूर्वी सप्टेंबर महिन्यात मेट्रो ३ ने १९.७ लाख प्रवाशांची नोंद केली होती. मात्र ९ ऑक्टोबरपासून संपूर्ण मार्ग खुला झाल्यानंतर ऑक्टोबरमध्ये प्रवासीसंख्या थेट ३८.६३ लाखांवर पोहोचली. त्यानंतर, नोव्हेंबरमध्ये ४४.५८ लाख, तर डिसेंबरमध्ये ४६.५६ लाख प्रवाशांनी मेट्रो ३ ने प्रवास केला, ज्यामुळे प्रवासीसंख्येत सातत्याने वाढ होत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

**रोजच्या प्रवासी संख्येत मोठी वाढ**

मिळालेल्या माहितीनुसार, अंतिम टप्प्याआधी आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी मेट्रो ३ ची सरासरी प्रवासी संख्या ७५,०५२ इतकी होती. मात्र, ऑक्टोबरमध्ये ही संख्या १.२३ लाखांवर पोहोचली. नोव्हेंबरमध्ये १.३२ लाख, तर डिसेंबरमध्ये सरासरी १.४८ लाख प्रवाशांनी दररोज मेट्रो ३ ने प्रवास केला. १६ ऑक्टोबरला आतापर्यंतची सर्वाधिक एकदिवसीय प्रवासीसंख्या नोंदवण्यात आली असून त्या दिवशी १.८२ लाख प्रवाशांनी मेट्रोचा वापर केला.

**लास्ट-माईल कनेक्टिव्हिटीवर भर**


मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, "पुढील काळात लास्ट-माईल कनेक्टिव्हिटी मजबूत करून प्रवासी संख्या आणखी वाढवण्यावर भर दिला जाणार आहे. बीकेसी, वरळी, आरे-जेव्हीएलआर आणि सीएसएमटी येथे Cityflo बस सेवेशी जोडणी करण्यात आली असून, याचे भाडे ९ रुपयांपासून सुरू होते. मागणीनुसार पीक अवर्समध्ये बसची वारंवारता १० मिनिटांपर्यंत वाढवली जाणार आहे."

**सेवा वाढवण्याचा निर्णय**

वाढत्या प्रवासी संख्येला सामोरे जाण्यासाठी मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड ने ५ जानेवारीपासून मेट्रो ३ च्या सेवांमध्ये वाढ केली आहे. आठवड्यातील कामकाजाच्या दिवशी फेऱ्या २६५ वरून २९२ करण्यात आल्या आहेत. शनिवारी २०९ ऐवजी २३६ फेऱ्या सुरू असून, रविवारी मात्र पूर्वीप्रमाणे १९८ फेऱ्या सुरू ठेवण्यात आल्या आहेत. पीक अवर्समध्ये गाड्यांमधील वेळ ६ मिनिटांवरून सुमारे ३ मिनिटांपर्यंत कमी करण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे.

**महत्त्वाच्या स्थानकांवर सर्वाधिक गर्दी**

इतर मेट्रो मार्ग व उपनगरीय रेल्वेशी जोडलेल्या स्थानकांवर मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. ऑक्टोबर ते डिसेंबरदरम्यान मरोळ नाका स्थानकावर १६.४५ लाख प्रवाशांची ये-जा झाली आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकावर १०.२८ लाख, बीकेसी स्थानकावर ७.३ लाख, तर सिद्धिविनायक (प्रभादेवी) आणि सांताक्रूझ स्थानकांवर प्रत्येकी ६.६६ लाख प्रवाशांनी प्रवास केला आहे.



**प्रवाशांना 'नो नेटवर्क' ही समस्या**

आता मेट्रो लाइनच्या काही भागांमध्ये केवळ व्होडाफोन आयडिया आणि बीएसएनएलला कनेक्टिव्हिटी मिळत आहे. मात्र, जिओ आणि एअरटेल प्रवाशांना मेट्रोच्या संपूर्ण मार्गिकेवर 'नो नेटवर्क' ही समस्या उद्भवत असते. आरे ते आचार्य अत्रे चौक (वरळी) स्थानकांपर्यंत नेटवर्क कनेक्टिव्हिटी असल्याचा दावा व्हीआयने केला आहे. परंतु, कस्टमर्स वरळी आणि कफ परेड दरम्यान नेटवर्क समस्यांची तक्रार करत आहेत. विशेष बाब म्हणजे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर अशीच परिस्थिती पाहायला मिळत आहे.

### ३ महिन्यांनंतर सुद्धा अंडरग्राउंड मेट्रोमध्ये नेटवर्क नाही...

# 'नो नेटवर्क'चं खरं कारण आलं समोर!

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईत मेट्रो ३ सुरू होऊन तीन महिने झाले आहेत. मात्र, तरीसुद्धा प्रवाशांना अजून 'नो नेटवर्क'च्या समस्येचा सामना करावा लागत आहे. या मेट्रोचं उद्घाटन करतेवेळी लवकरात लवकर या मेट्रो लाइनवर मोबाईल नेटवर्क मिळणार असल्याचं आश्वासन करण्यात आलं होतं. परंतु, या मेट्रो सेवेला तीन महिने उलटूनही नवीन वर्षात काही सिम कार्ड्सना अद्याप नेटवर्क मिळालं नाही. यामागचं नेमकं कारण काय?

एमएमआरसीएलने मेट्रो लॉन्च करतेवेळी सबवेवर नेटवर्कची सुविधा देण्याचं आश्वासन दिलं होतं. परंतु, वरळी आणि कुलाबा दरम्यान असलेल्या स्थानकांवर प्रवाशांना नेटवर्क ब्लॅकआउटच्या समस्येचा सामना करावा लागत आहे. या मुद्द्यावर टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडर्स आणि मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड (एमएमआरसीएल) यांच्यात वाद सुरू आहे.

एमएमआरसीएलने ॲक्वा लाइनसाठी एसीईएस इंडिया लिमिटेडसोबत पार्टनरशिप केली आहे. परंतु, टेलिकॉम कंपन्यांचा आरोप आहे की एसीईएस नेटवर्क डिप्लॉयमेंटसाठी अत्यधिक दर आकारत आहे. यासाठी बऱ्याच मीटिंग होऊनही, कोणताही उपाय सापडला नाही आणि काही मेट्रो प्रवाशांना अजूनही नेटवर्कची सुविधा मिळून शकत नाहीये. एका प्रमुख टेलिकॉम ऑपरेटरच्या सूत्रांनुसार, अउएर ११८ कोटीं रुपयांचा कॅपिटल खर्च (कॅपेक्स) असल्याचा दावा केला आहे. तसेच, टेलिकॉम सर्व्हिस प्रोव्हायडर्स (टीएसपी) च्या अंतर्गत अंदाजानुसार, हा खर्च फक्त ३० कोटी असावा.

सूत्रांच्या माहितीनुसार, सुरूवातीला मुंबई मेट्रो आणि त्यांचे वेंडर म्हणजेच विक्रेते प्रति स्थानक १३ लाख रुपयांची मागणी करत आहेत. त्यानंतर, हे शुल्क प्रति स्थानक ५.५ लाख रुपये करण्यात आलं. तसेच, ळरढ च्या अंतर्गत गणनेनुसार, प्रत्येक स्थानकावर दरमहा ३९,००० रुपयांचा भांडवली खर्च आणि त्यावर १० टक्के मॅनेजमेंट फी देण्याची अपेक्षा आहे. या आर्थिक वादामुळे, अंडरग्राउंड मेट्रोमधील नेटवर्कची समस्या अजूनही सुटलेली नाही आणि याचा थेट परिणाम प्रवाशांवर होत आहे.

### १५ जानेवारीला मतदानासाठी सुट्टी, सवलत नाही?

# 'या' क्रमांकावर साधा संपर्क



**या क्रमांकावर संपर्क साधा**

मतदानाच्या दिवशी सुटी किंवा सवलत न दिल्यास दुकाने व आस्थापना खात्यामार्फत कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी मुंबई शहर, पूर्व उपनगरे व पश्चिम उपनगरे यांसाठी दक्षता पथके नियुक्त करण्यात आली आहेत. नागरिकांनी दूरध्वनी क्रमांक ९१२२-३१५३३१८७ यावर संपर्क साधावा, असे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे.

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष मतदान प्रक्रिया पार पडणार असून, या दिवशी महानगरपालिका कार्यक्षेत्रात सार्वजनिक सुटी जाहीर करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभाग तसेच उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग यांनी याबाबतचे अध्यादेश निर्गमित केले आहेत.

निर्णयाची या अंमलबजावणी प्रभावी करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाने मुंबई शहर, पूर्व उपनगरे आणि पश्चिम उपनगरे यांसाठी स्वतंत्र 'दक्षता पथके' स्थापन केली आहेत. मतदानाच्या दिवशी सुटी किंवा आवश्यक सवलत न दिल्यास संबंधित आस्थापनांवर योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशारा पालिका प्रशासनाने दिला आहे.

पालिका क्षेत्रातील केंद्र व राज्य शासनाची शासकीय व निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम, बँका आदींना ही सार्वजनिक सुटी लागू राहणार आहे. पालिका निवडणूक क्षेत्रातील मतदार शहराबाहेर कार्यरत असले तरी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी ही सुटी लागू राहील, असे अध्यादेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागानेही सार्वजनिक सुटीबाबत स्वतंत्र आदेश काढले असून, सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने, खासगी कंपन्या, निवासी हॉटेल्स, खाद्यगृहे, नाट्यगृहे, व्यापार व औद्योगिक उपक्रम, माहिती व तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर्स, मॉल्स व रिटेलर्स यांनाही सुटी लागू राहणार आहे.

# कल्याण डोंबिवलीत सुरक्षा व्यवस्थेसाठी पोलीस सज्ज



■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर परिमंडळ ३, कल्याण अंतर्गत कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने व्यापक आणि कडेकोट बंदोबस्त केला आहे.

कल्याण परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त अतुल झेंडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, निवडणूक प्रक्रिया शांततेत आणि निर्भय वातावरणात पार पडावी यासाठी विविध प्रतिबंधात्मक कारवाईचे उपाय राबविण्यात आले आहेत. कल्याण परिमंडळ ३ अंतर्गत एकूण ३१ प्रभागांमध्ये ३४४ मतदान केंद्रे आणि १ हजार ४५७ मतदान बूथ निश्चित करण्यात आले आहेत.

याठिकाणी मतदानाच्या दिवशी चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार असून 'व्हीएसटी', 'एफएसटी' आणि ९ 'एसएसटी'पथके तैनात करण्यात आली आहेत. निवडणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ९ ठिकाणे निश्चित करण्यात आली आहेत. त्यामध्ये महात्मा फुले चौक, बाजारपेठ, कोळसेवाडी, खडकपाडा, डोंबिवली, विष्णुनगर, मानपाडा आणि टिळकनगर परिसराचा समावेश आहे. त्यामध्ये एकूण ४९ पोलीस सेक्टर तयार करण्यात आले असून त्यासाठी अतिरिक्त पोलीस अधिकारी आणि कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत.

निवडणूक काळात सुरक्षेच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात शस्त्र जमा करण्यात आली आहेत. बँक आणि इतर संस्थांकडील शस्त्रांसह एकूण १,३०१ शस्त्रांपैकी १,११० शस्त्र जमा करण्यात आली असून. उर्वरित शस्त्रांवर देखरेख ठेवण्यात आली आहे.तसेच मपोका कलम ५५, ५६, ५७,मकोका, एमपीडीए तसेच विविध कलमांअंतर्गत एकूण २,५२७ प्रतिबंधक कारवाया करण्यात आल्या आहेत. अवैध दारू, अमली पदार्थ, शस्त्रे यांच्याविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. यामध्ये गावठी कट्टे, काडतुसे, दारू, गांजा तसेच कारवाईदरम्यान ९ लाख रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. या कारवाईत अनेक आरोपींना अटक करण्यात आली आहे. निवडणूक काळात ४ कोम्बिंग ऑपरेशन, ९ रूट मार्च आणि ७ दंगा नियंत्रण योजना राबविण्यात आल्या आहेत. तसेच संपूर्ण परिमंडळात २४ ड्रोनच्या माध्यमातून मतदान आणि मतमोजणी प्रक्रियेवर लक्ष ठेवण्यात येत आहे. मतदान यंत्रांच्या सुरक्षेसाठी मुख्य स्ट्राँगरूम १ आणि आरओ स्तरावरील ९ स्ट्राँगरूम, अशा एकूण १० स्ट्राँगरूम सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. पोलीस प्रशासनाने नागरिकांना निर्भयपणे मतदान करण्याचे आवाहन केले असून, कोणतीही अनुचित घटना घडल्यास तात्काळ पोलीस यंत्रणेशी संपर्क साधण्याचे आवाहन डीसीपी अतुल झेंडे यांनी केले आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पाडण्यासाठी पोलीस दल सज्ज असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# पहिल्याच दिवशी ३११ कर्मचाऱ्यांनी बजावला टपाली मतदानाचा हक्क

**'विशेष टपाली मतदान सहाय्यता कक्ष'**

या अनुषंगाने कल्याण-डोंबिवली महानगरपालिका हद्दीतील सर्व ९ निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात 'विशेष टपाली मतदान सहायता कक्ष' स्थापन करण्यात आले आहेत. या कक्षांमध्ये दिनांक ९, १० व ११ जानेवारी रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत संबंधित अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष उपस्थित राहून मतदान करू शकतात, अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

■कल्याण। प्रतिनिधी,

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक कर्तव्यावर नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी महापालिकेच्या वतीने टपाली मतदानाची विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ही सुविधा ११ जानेवारीपर्यंत सर्व निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कार्यालयात




उपलब्ध करून देण्यात आली आहे.

महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान प्रक्रिया, तर दिनांक १६ जानेवारी रोजी मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार आहे. या कामासाठी मोठ्या प्रमाणावर अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. कल्याण-डोंबिवली महापालिका हद्दीत मतदार म्हणून नोंदणी असलेले, मात्र महापालिकेत किंवा बृहन्मुंबई महानगरपालिका, अंबरनाथ नगरपरिषद आदी ठिकाणी निवडणूक कर्तव्यावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना १५ जानेवारी रोजी प्रत्यक्ष मतदान करणे शक्य होणार नसल्याने, त्यांच्या सोयीसाठी टपाली मतदानाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### शासकीय रेखाकला परीक्षेचा निकाल जाहीर...

# २ लाखांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण



**२ लाखांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण**

इंटरमिजिएट परीक्षेसाठी ३ लाख १४ हजार ६६६ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी ३ लाख ७ हजार ८२४ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, तर ६ हजार ८४२ विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित होते. परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांपैकी २ लाख ९५ हजार २२३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

■मुंबई। प्रतिनिधी,

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड) परीक्षेचा निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. एलिमेंटरी परीक्षेचा निकाल ९७.४० टक्के तर इंटरमिजिएट परीक्षेचा निकाल ९५.९० टक्के लागला आहे. एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉइंग ग्रेड परीक्षेचा निकाल https://msbae.ac.in या संकेतस्थळावरील GRADE EXAM या टॅबमध्ये व https://dge.msbae.in/ https://dge.msbse.in/ Result/Search/Form या लिंकवर पाहता येणार आहे.

महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळांतर्गत घेण्यात आलेल्या शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड) परीक्षा शालेय स्तरावर सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आली होती. एलिमेंटरी व इंटरमिजिएट परीक्षांमध्ये २०२५ या वर्षी एकूण ७.१९,४४१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. एलिमेंटरी परीक्षेसाठी ४ लाख ४ हजार ७७५ विद्यार्थ्यांनी नोंदणी खेळू होती. यापैकी ३ लाख ९० हजार १०१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते, तर १४ हजार ६७४ विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले होते. या परीक्षेत ३ लाख ७९ हजार ९५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

# भिवंडीत १५३ मतदान केंद्र संवेदनशील घोषित

## शहरातील २१ टक्के मतदान केंद्र संवेदनशील, पोलिसांनी विशेष खबरदारी वाढवली

■भिवंडी। प्रतिनिधी,

संवेदनशील शहर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडीमध्ये ७१८ मतदान केंद्रांपैकी १५३ मतदान केंद्र संवेदनशील म्हणून घोषित करण्यात आले आहेत. ही संख्या सर्वसाधारण केंद्रांच्या तुलनेत २१ टक्के आहे. यामध्ये शांतीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ५८ केंद्रे सर्वाधिक संवेदनशील म्हणून गणली गेली आहेत.

भिवंडीत निवडणूक कार्यकाळात अनेक हाणामारी, दमदाटी आणि दहशत



पसरविण्याचे प्रकार ठिकठिकाणी घडत असतात. यामुळे शहरातील काही मतदान केंद्र इमारती, मतदान केंद्र संवेदनशील मानली जातात.

**१५३ मतदान केंद्र संवेदनशील**

शहरातील एकूण १७३ मतदान केंद्र इमारतीमध्ये ७१८ मतदान केंद्रांचे मतदान होणार आहे. यापैकी १४६ इमारतीतील ५६५ मतदान केंद्र सर्वसाधारण, २७ इमारतीतील १५३ मतदान केंद्र संवेदनशील घोषित करण्यात आली आहेत. संवेदनशील केंद्रांमध्ये आयटीआय इमारत, ईदगाह, हंडी कंपाऊंड, आजमी नगर, टावरे कंपाऊंड, समद नगर, नवी बस्ती, प्रभाग क्रमांक ३ इमारत, शास्त्रीनगर, भाग्यनगर, संगम पाडा, कोंबडपाडा, म्हाडा कॉलनी, बंदर मोहल्ला, भंडारी कंपाऊंड यांचा समावेश आहे.

# क्लब मालकाच्या घरातून १५ लाखांच्या ट्रॉफी चोरीला

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबईतील एका क्लब मालकाच्या घरातून विविध डर्बी स्पर्धांमध्ये जिंकलेल्या चांदी व सोन्याने मढवलेल्या तब्बल ६० ट्रॉफी चोरीला गेल्याची घटना उघडकीला आली आहे. या ट्रॉफींची किंमत सुमारे १५.२४ लाख रुपये आहे. या प्रकरणी घरातील नोकराविरुद्ध गावदेवी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, अशी माहिती पोलिसांनी दिली.

दक्षिण मुंबईतील ब्रीच कँडी येथील वेस्टफिल्ड इस्टेट कंपाऊंडमधील एका फ्लॅटमध्ये २०२३ ते नोव्हेंबर २०२५ या कालावधीत ही चोरी झाल्याचे एका अधिकाऱ्याने मंगळवारी सांगितले. शिवेन सुरेंद्रनाथ (५९) हे जाहिरात चित्रपट दिग्दर्शक असून रॉयल वेस्टर्न इंडिया टर्फ क्लब लिमिटेड (आरडब्ल्यूआयटीसी) क्लब आणि डायमंड बँड रेसिंग सिंडिकेट प्रा. लि.चे मालक आहेत. त्यांनी नुकतीच या प्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. सुरेंद्रनाथ यांनी २००६ पासून विविध प्रतिष्ठित डर्बी स्पर्धा जिंकल्या असून त्या बदल्यात त्यांना चांदी व सोन्याने मढवलेल्या ट्रॉफी मिळाल्या होत्या. नोकर राजेंद्र जेना (४२) हा ओदिशाचा रहिवासी होता. जेना गेल्या पाच वर्षांपासून त्यांच्या घरी काम करत होता.

### तरुणाच्या गुप्तांगात पेट्रोल ओतलं, नंतर त्याला इंजेक्शन दिलं...

# पोलीस ठाण्यात धक्कादायक कृत्य



**पीडित तरुणाने सर्व सांगितलं...**

पीडित मनीषने आपल्यासोबत घडलेला सर्व प्रकार सांगितला, दरम्यान तो ताजपूर बाजारातील सोनी ज्वेलर्समध्ये काम करतो. काही दिवसांपूर्वी दुकानातून चोरी झाल्याचा संशय मनीषला बळावला गेला आणि नंतर त्याला ओलीस ठेवण्यात आले होते, नंतर मारहाण केली आणि पोलिसांकडे देण्यात आले होते.

■मुंबई। प्रतिनिधी,

एका तरुणावर क्रूरतेची सीमा ओलांडल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. बिहारच्या समस्तीपूर जिल्ह्यातील ताजपूर पोलीस ठाण्यात ताब्यात असलेल्या एका तरुणावर क्रूरपणे हल्ला करत त्याला संपवलं. नंतर तरुणाला अमानुषपणे वागणूक दिली. जखमी असलेले मनीष कुमार हे गंभीर आजारी पडल्यानंतर त्याच्या कुटुंबीयांनी त्याला ताजपूर रुग्णालयात दाखल केले, नंतर त्याच्यावर चांगले उपचार करण्यासाठी समस्तीपूर रुग्णालयात पाठवले होते. या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली.

**'सुईने इंजेक्शन दिलं आणि गुप्तांगात पेट्रोल ओतलं...'**

मनीषने आरोप केला की, पोलिसांनी त्याला चार दिवस ताब्यात ठेवले आणि त्याचा शारीरिक आणि मानसिक छळ केला होता. नंतर त्याने दावा करत सांगितलं की, त्याला कोठडीत डांबले होते तेव्हा बेदम मारहाण करण्यात आली होती. एका पोलीस अधिकाऱ्याने त्याला सुईने इंजेक्शन दिलं होतं. नंतर त्याच्या गुप्तांगात पेट्रोल ओतले होते. तेव्हा पोलिसांनी त्याच्या पत्नीवर हल्ला केला आणि संपूर्ण कुटुंबाला धमकावण्यात आले होते, असा पीडिताचा आरोप आहे.

दरम्यान, ४ जानेवारी रोजी वैयक्तिक जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांची प्रकृती आणखी बिघडल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, पोलिसांनी सांगितलं की, व्हायरल झालेल्या संबंधित व्हिडिओच्या आधारे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एसडीपीओ-1 यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार करण्यात आलं.

# दोघांमध्ये कडाक्याचं भांडण, संतापात बहिणीसमोर लहान भावाने मोठ्याला संपवलं

■नाशिक। प्रतिनिधी,

नाशिकमध्ये भावाकडूनच भावाची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. भंडाऱ्यातील प्रसाद घरी आणण्याच्या कारणाहून वाद होऊन वादाचे पर्यावसन हाणामारीत होऊन गंभीर झालेल्या लहान भावाकडून मोठ्या भावाची हत्या झाल्याची घटना घडली आहे. याबाबत नाशिकच्या उपनगर पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धक्कादायक बाब म्हणजे, ही हत्या लहानभावाने आपल्या सख्ख्या बहिणीसमोर केली. त्यामुळे बहिणीने फिर्याद दिली आहे. दि. ९ जानेवारी शुक्रवारी रोजी दुपारच्या सुमारास संशयित सनी बोरसे (वय ३०, रा.सुयोग नगर, आर. टी. ओ.कॉलनी, बोधले नगर, नाशिक पुणे रोड, नाशिक) याने भाऊ योगेश बोरसे याला भंडाऱ्यातील प्रसाद घरी आणल्याच्या कारणाहून वाद घालून, लाथा बुक्याने आणि लाकडी दांडक्याने कपाळ आणि पाठीवर जोराने मारून त्याला जीवे ठार मारले. या प्रकरणी मोलमजुरी करून दोघा भावांसोबत राहणारी त्यांची बहीण रेखा दत्तू बोरसे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून उपनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संशयित सनी बोरसे याला अटक करण्यात आली आहे.

**निफाडमध्ये कडाक्याच्या थंडीने २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू**

तालुक्यात थंडी जीवघेणी ठरत असून, देवगाव (ता. निफाड) येथील २२ वर्षीय तरुणाचा थंडीत काकडून मृत्यू झाल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे. देवगाव येथील पाटबंधारे विभागाच्या कार्यालयाजवळ शुक्रवारी सकाळी आठच्या सुमारास समीर दौलत सोनवणे (वय २२) हा तरुण मृतावस्थेत आढळून आला. पोलिसपाटील सुनील बोचरे यांनी लासलगाव पोलिसांना तत्काळ माहिती दिली. शवविच्छेदनाच्या प्राथमिक अहवालानुसार अतिथंडीमुळे हृदयविकाराच्या तीव्र झटक्या तरुणाचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले आहे. वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी विशेषतः रात्रीच्या वेळी काळजी घ्यावी, असे आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केले आहे. निफाडचे तापमान गहू कृषी संशोधन केंद्रात शुक्रवारी ६.१ अंश सेल्सिअस नोंदले गेले असून, कडाक्याच्या थंडीमुळे देवगाव (ता. निफाड) येथील २२ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४०००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com